आर्थिक वर्ष सन २०२२–२३ या वर्षासाठीची बँकेची ७४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक १० जुलै २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता टिळक स्मारक मंदिर,१६५१ सदाशिव पेठ, टिळक रोड, एस.पी.कॅालेज जवळ,पुणे ४११ ०३० येथे आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेस एकूण ६२३ सभासद उपस्थित होते.

व्यासपीठावर सभेचे अध्यक्ष श्री. रविंद्र बळवंत हेजीब, अध्यक्ष संचालक मंडळ, अॅड. सौ. अलका विजय पेटकर, उपाध्यक्षा, श्री जगदीश पुरुषोत्तम कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उर्वरित सर्व संचालक उपस्थित होते. सभेचे नियोजित वेळी म्हणजे दुपारी ३.०० वाजता सुरुवातीस सचिव श्री संजय भास्कर आगाशे यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले. तसेच गणपुर्ती नसल्यामुळे दुपारी ३.३० वाजेपर्यंत सभेचे कामकाज स्थगित होत असल्याचे सांगितले.

दरम्यानचे कालावधीमध्ये अध्यक्षांचे परवानगीने सभासदांसाठी सायबर सिक्युरिटी या विषयावर एक माहितीपर कार्यक्रम श्री आशिष अरविंद नवरे, चीफ इन्फर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर (CISO) यांनी सादर केला. यावर काही सभासदांनी हा कार्यक्रम अतिशय उपयुक्त असून त्याचा तपशील पीडीएफद्वारे सभासदांना ईमेलने पाठविण्याची सूचना केली. त्याची नोंद घेण्यात आली व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले. त्यावर संबंधित सभासद यांनी समाधान व्यक्त केले.

दूपारी ३.३० वाजता देखील गणपुर्ती नसल्यामुळे पुढील १० मिनिटे सभेचे कामकाज स्थगित होत असून दुपारी ३.४० वाजता सभेचे कामकाज सुरु होईल असे सचिव श्री संजय आगाशे यांनी सांगितले. या दरम्यान गणपुर्तीसाठी आवश्यक तेवढी (५००) सभासद संख्या ही दुपारी ३.४० वा. पूर्ण झाली.

यानंतर दूपारी ३.४० वाजल्याचे नमूद करुन अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभेचे कामकाज सुरु होत असल्याचे सांगितले. तसेच श्री संजय आगाशे, सचिव यांना सभेची सूचना वाचून दाखविण्याची सूचना केली.

त्यानुसार श्री संजय आगाशे, सचिव यांनी सभेची सूचना प्रथम मराठी भाषेमध्ये व त्यानंतर इंग्रजी भाषेमध्ये वाचून दाखविली. तसेच वाहन तळ पार्किंग व्यवस्था, अहवाल वितरण व मागील सभेचे इतिवृत्त वितरण व्यवस्था, रिफ्रेशमेंट बॅाक्सेस वितरण व्यवस्था, चहापान व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, टॅायलेट ब्लॅाक्स व्यवस्था इत्यादि बाबत माहिती दिली. सभेचे सुरुवातीस उपस्थित सभासदांना ७४ वा वार्षिक अहवाल व मागील ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, सन २०२३–२४ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक, संचालक नातेवाईक कर्जे, संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी नातेवाईक सेवक याचा तपशील, अध्यक्षांचे मनोगत इत्यादि समाविष्ट असलेली छापील रंगीत पुस्तिका सभेचे आधी उपस्थित सभासदांना वितरित करण्यात आली.

त्यानंतर अध्यक्षांचे सूचनेवरुन श्री संजय आगाशे, सचिव यांनी दुखवटयाच्या ठरावाचे वाचन केले. तदनंतर सभेने मागील वर्षात निधन पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण केली. श्रध्दांजलीमध्ये खासदार व माजी मंत्री गिरीष बापट, आमदार व माजी महापौर मुक्ता टिळक, आमदार लक्ष्मणराव पांडुरंग जगताप, समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंह यादव, एअर मार्शल हरजितसिंग अरोरा, महावीर चक्र सन्मानित हवाई दलाचे अधिकारी जग मोहन नाथ, बँकेचे माजी संचालक व तळेगाव नगर परिषदेचे अध्यक्ष सुरेशभाई शहा, विज्ञान भारतीचे जयंतराव सहस्त्रबुध्दे, भारतीय शिक्षण मडळाचे विनायक विश्वनाथ कानेटकर, भारतीय किसान संघाचे प्रांत अध्यक्ष ज्ञानेश्वर तुपे, भारतीय मजुदर संघाचे वसंतराव वहाडणे, टाटा स्टीलचे संचालक जमशेदजी इरानी, महिंद्रा ग्रूपचे अध्यक्ष केशूब महिंद्रा, उदयोजक विक्रम किर्लोस्कर, उदयोजक विजयराव आठवले, समाजसेविका जयंती पटनाईक, न्युक्लिअर इंजिनिअर ए. गोपाळकृष्णन, इंडियन एक्सप्रेसचे पत्रकार राज कंवर, अभिनेत्री सूलोचना, अभिनेते विक्रम गोखले तसेच बँकेचे आजी माजी दिवंगत सभासद व सेवक यांचा समावेश होता.

तदनंतर श्री संजय आगाशे, सचिव यांनी मा. अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांना त्यांचे मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली. त्यानंतर अध्यक्ष, श्री रविंद्र हेजीब यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये पुढील मुद्दयांचा अंतर्भाव होता.

१. अध्यक्ष यांनी सुरुवातीस सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले.

२. त्यानंतर सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जागतिक तसेच देश पातळीवर घडलेल्या घटना व बँकिंग क्षेत्रावर त्याचे झालेले परिणाम याचा आढावा घेतला. यामध्ये केंद्र सरकारने सहकार मंत्रालयाची केलेली स्थापना व श्री अमित शहा यांचेकडे त्याची सोपविलेली जबाबदारी याचा उल्लेख केला. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी नुकतेच अंमलात आणलेले चार पदरी स्ट्रक्चर, सुपरवायजरी ॲक्शन फ्रेम वर्क व एफ.एस.डब्ल्यू.एम. (F.S.W.M. Norms) यासंदर्भातील निकषांमध्ये झालेले बदल याचा तपशील नमूद करुन आर्थिक शिस्त येण्यासाठी त्याचा निश्चीतच परिणाम होईल असे सांगितले.

३. अहवाल वर्षामध्ये बँकेच्या उल्लेखनीय बाबींचा आढावा अध्यक्ष यांनी घेतला. त्यामध्ये सुरुवातीस दि.१५.०४.२०२३ रोजी वैधानिक लेखा परिक्षण पुर्ण होऊन लेखा परिक्षीत आकडेवारी जाहीर करण्यामध्ये आलेले यश याचा उल्लेख केला. त्यानंतर अटल पेन्शन योजने अंतर्गत उघडलेली विक्रमी खाती व केंद्र सरकार यांनी केलेले बँकेचे कौतुक याविषयी सांगितले. तसेच ‘ आझादी का अमृत पर्व ’ व ‘ मिशन अश्वमेध ५००’ या अंतर्गत केलेले कर्जवाढ अभियान, रिकरिंग व्यवसाय वाढ अभियान, म्युच्यूअल फंड एस.आय.पी. अभियान इत्यादि व्यवसायविषयक बाबींचा आढावा घेतला. त्यानंतर ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चरमध्ये बदल करुन अधिक प्रभावी व सक्षम केलेले ऑर्गनायझेशन स्ट्रक्चर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार चीफ रिस्क ऑफिसर, चीफ कंम्प्लायन्स ऑफिसर इत्यादिंची केलेली नियुक्ती याविषयी कथन केले. तसेच प्रभावी कॅार्पोरेट गव्हर्नन्स, मेसेज व वेबसाईटद्वारे केवायसी अदययावत करण्याची उपलब्ध केलेली सूविधा, दुर्बल

क्षेत्रातील शॉर्टफॉल संदर्भात सिडबी बॉन्डमध्ये केलेली गुंतवणूक, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर यांचे बरोबर झालेली सदिच्छा भेट इत्यादिची ही माहिती दिली.

४. अहवाल वर्षात ठेव व्यवसायामध्ये झालेली रु.१७७.०२ कोटी एवढी वाढ तसेच ठेव व्यवसायातील व्याजदर आव्हाने, फंडींग रिस्क कमी करण्यासाठी बँकेने अवलंबिलेले बल्क डिपॉझिट कमी करण्याचे धोरण इत्यादि बाबींचा आढावा घेतला.

५. डी.आय.सी.जी.सी. सभासदत्व व त्यापोटी बँकेने भरलेली अद्ययावत रक्कम याची माहिती दिली.

६. सी.आर.ए.आर. मापदंड या संदर्भात प्राथमिक माहिती व त्याचे महत्व सांगितले. तसेच अहवाल वर्षअखेरीस बँकेचा असलेला सीआरएआर १३.७२ टक्के व मागील वर्षीचे तुलनेमध्ये अहवाल वर्षामध्ये त्यात झालेली घट आणि त्याची कारणमिमांसा याची माहिती दिली. बँकेचा सीआरएआर हा रिझर्व्ह बँकेने सांगितलेल्या ९ टक्के या आवश्यक मर्यादेपेक्षा जास्तच असल्याचे सांगितले.

७. त्यानंतर बँकेचे टीअर १ भाग भांडवल हे देखील रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या CRAR च्या ९% निकषापेक्षा जास्त असल्याचे नमुद केले व त्याचा तपशील विदित केला.

८. अहवाल वर्षअखेरीस बँकेने केलेला रु.५१२०.७८ कोटी एवढया रकमेचा कर्ज व्यवसाय, अहवाल वर्षामध्ये कर्जव्यवसाय वाढीसाठी केलेल्या उपाययोजना, कर्जव्यवस्थापन व गतिमान कर्ज वितरण, अग्रक्रम कर्ज, बँकेमध्ये कार्यरत विविध कर्ज योजना इत्यादिचा थोडक्यात परामर्श घेतला.

९. बँकेमध्ये कार्यरत असलेली कर्ज देखरेख प्रणाली तसेच अहवाल वर्ष अखेरीस इंट्रा ईयर व एकूणच एनपीए खातेसंख्या व एनपीए रक्कम कमी करण्यामध्ये मिळालेले यश याविषयी सांगितले.

१०. बँकेमध्ये कार्यरत केलेली जोखीम व्यवस्थापन प्रणाली, ॲसेट लायबिलिटी व्यवस्थापन इत्यादिची माहिती दिली.

११. अहवाल वर्षअखेरीस बँकेने रु.१४५.४३ कोटी एवढा परिचलनात्मक नफा मिळविला असून निव्वळ नफा (Before Appropriation) रु.८.१३ कोटी आहे. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार गंगाजळी, शैक्षणिक फंड इत्यादि प्रकारे नफा वाटणी करुन उर्वरित राहिलेला निव्वळ नफा रु.५.२१ कोटी हा ताळेबंदास वर्ग करण्याची शिफारस केली आहे. त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता दयावी अशी विनंती केली.

१२. बँक अधिक सक्षम करण्याचे दृष्टीने तरतूदी व रिझर्व्हज यामध्ये वाढ करण्याचे धोरण बँकेने नक्की केलेले असल्यामुळे व लाभांशासाठी पुरेसा निधी शिल्लक राहत नसल्याने अहवाल वर्षासाठी कोणताही लाभांश सभासदांना प्रस्तावित केलेला नसल्याचे अध्यक्षांनी आपल्या मनोगतामध्ये स्पष्ट केले.

१३. एनपीए वसूली व क्वांटिफाएबल रोड मॅप, ढोबळ एनपीए व नेट एनपीए, एआरसी कडे दिलेल्या कर्जांची वसूली एनपीए आयडेंटिफिकेशन प्रोसेस मध्ये केलेला बदल तसेच ऑनलाईन एनपीए याद्वारे होत असलेले सिस्टीम बेस्ड एनपीए आयडेंटिफिकेशन याची माहिती दिली.

१४. बँकेच्या गुंतवणूकीमध्ये अहवाल वर्ष अखेरीस बँकेची असलेली गुंतवणूक रु.४२८७.५६ कोटी व अहवाल वर्षामध्ये गुंतवणूकीद्वारे मिळालेले रु.२९३.०६ कोटी एवढे उत्पन्न याची माहिती दिली. तसेच सरकारी कर्ज रोखे, अन्य गुंतवणूक पर्याय यामध्ये गुंतवणूक केली जात असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सूचनांचे बँक पालन करते असे सांगितले.

१५. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सूचनेनुसार विहित कालावधी आधीच बँकेने कंम्प्लायन्स डिपार्टमेंट गठित केले आहे. याचे विभाग प्रमुख म्हणून उपमहाव्यवस्थापक दर्जाचे अधिकारी चीफ कंम्प्लायन्स ऑफिसर म्हणून नियुक्त केले आहेत. त्याद्वारे बँकेमध्ये सुयोग्य कंम्प्लायन्स कल्चरची सुरुवात झाली आहे असे सांगितले.

१६. बँकेमधील कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे अनुषंगाने संचालक मंडळ व विविध समित्या यांचे कामकाजासंबंधीची माहिती दिली. तसेच याबाबतीत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व अन्य नियंत्रक यांचे मार्गदर्शक तत्वांचे कसोशीने पालन केले जात असल्याचे सांगितले.

१७. अहवाल वर्षामध्ये सभासदांच्या सोईसाठी बँकेने सुरु केलेल्या पॉझिटिव्ह पे, लोन एलिजीबिलिटी लेटर, आरोग्य विमा इत्यादि नवीन सुविधांची माहिती सभासदांना विदित केली.

१८. बँकेमध्ये कार्यरत असलेले सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर तसेच सायबर सुरक्षा प्रणाली याबाबत थोडक्यात माहिती दिली.

१९. बँकेमध्ये कार्यरत असलेले विविध लेखा परिक्षण, तसेच जोखीम आधारित अंतर्गत लेखा परिक्षण व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी दिलेल्या रिस्क मिटिगेशन प्लॅन व त्याची बँकेने निर्धारित वेळेत केलेली पुर्तता याबाबतची माहिती दिली.

२०. प्रशासन व मनुष्य बळ व्यवस्थापन याचे अनुषंगाने अहवाल वर्षामध्ये बँकेने केलेली नवीन सेवक भरती, प्रशिक्षण, पदोन्नती इत्यादि माहिती संक्षिप्त स्वरुपात सांगितली. तसेच बँकेमध्ये सलोख्याचे औदयोगिक संबंध असल्याचेही सांगितले.

२१. अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळाने बँकेच्या उपविधीमध्ये कोणतीही पोट नियम दुरुस्ती प्रस्तावित केलेली नाही असे नमूद केले.

२२. मनोगताचे शेवटी अध्यक्ष यांनी सर्व सभासद, व्यवस्थापकीय मंडळ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व अन्य नियंत्रक, सेवक संघटना इत्यादि विविध संस्था व व्यक्तींचे आभार व्यक्त करुन त्यांना धन्यवाद दिले.

तदनंतर अध्यक्ष यांनी श्री संजय आगाशे, सचिव यांना विषयपत्रिकेमध्ये नमूद विविध विषय वाचण्याची सूचना केली. तसेच संबंधित विषयासंदर्भात सभासद यांनी काही सूचना केल्यास त्याबाबत एकत्रित स्वरुपात माहिती अथवा तपशिल श्री जगदीश पुरुषोत्तम कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी व अध्यक्ष हे शेवटी विदित करतील असे सांगितले.

त्यानुसार विषयांचे वाचन व त्यावर झालेली चर्चा, संमत झालेला ठराव इत्यादिचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

**विषय क्रमांक १** – शुक्रवार दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**प्रस्तुत विषयावर झालेली चर्चा** – मागील वर्षी शुक्रवार दि.२३ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सचिवांनी वाचण्यास सुरुवात केली. त्यावर सभासदांनी त्याची प्रत मिळाली असून ती वाचल्याचे नमूद करुन आता पुन्हा संपूर्ण वृत्तांत वाचण्याची गरज नसल्याचे सूचित केले.

यासंदर्भात अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का ? याबाबत उपस्थित सभासद यांना विचारणा केली. त्यावर श्री.सु.पां.वाणी (सभासद क्र.१७२०) मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यास हरकत नाही परंतू येथून पुढे मागील सभेचे इतिवृत्त हे सभेच्या आधी काही दिवस जे सभासद सभेला उपस्थित होते त्यांना पाठवावे अशी सूचना केली. त्यांचे सूचनेची नोंद घेण्यात आली. तसेच ही सूचना चांगली असून बँकेकडून त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल व सभासदांना ईमेलद्वारे सभेचा वृत्तांत पाठविण्यात येईल असे श्री जगदीश कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

तदनंतर प्रस्तुत विषयावर पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्रमांक १** – ठराव करण्यात येतो की, मागील वर्षी शुक्रवार दि.२३ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सूचक – श्री प्रभाकर दशरथ कांबळे | अनुमोदक – सौ पद्मजा श्रीधर कुलकर्णी |
| सभासद क्रमांक – १०४३४९ | सभासद क्रमांक – २१६१७१ |

तदनंतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्रमांक २** – रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकानुसार दि.३१.०३.२०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, त्यावरील विविध प्रगटने मंजूर करुन नफा विभागणी करणे आणि वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

यासंदर्भात वार्षिक अहवालामध्ये नमूद केलेली माहिती उपस्थित सभासदांना विषद केली तसेच ही माहिती सर्व सभासदांना पोस्टाने देखील पाठविल्याचे सांगितले. या विषयासंदर्भात अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का तसेच प्रस्तुत ठराव मंजूर अथवा नामंजूर याबाबत उपस्थित सभासद यांना विचारणा केली. त्यानुसार प्रस्तुत विषयाबाबत पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

**प्रस्तुत विषयावर झालेली चर्चा** –

१) श्री सुधाकर पांडुरंग वाणी – सभासद क्रमांक १७२० – वैधानिक लेखापरिक्षक यांनी सन २०२२-२३ या वर्षाचे लेखा परिक्षण पुर्ण करुन त्यांचा अहवाल दि.१५.०४.२०२३ रोजी दिलेला असून लेखा परिक्षीत आर्थिक पत्रके दि.१५.०४.२०२३ रोजी बँकेने जाहीर केलेली आहेत. मात्र या वर्षासाठीची वार्षिक सर्वसाधारण सभा ही सुमारे तीन महिन्यांनंतर होत आहे. वैधानिक लेखा परिक्षण पुर्ण होऊन वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुमारे एक महिन्यामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची सूचना आहे. अशा प्रकारे वार्षिक सर्वसाधारण सभा लगेच घेण्याचा प्रघात काही बँकांमध्ये आहे. असे केल्यास वैधानिक लेखा परिक्षण अहवाल जाहीर झाल्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभा यामध्ये फारसा कालावधी वाया जाणार नाही. तसेच बँकेलाही वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यांनतर उर्वरित आर्थिक वर्षाचा कालावधी हा व्यवसाय वाढीच्या नियोजनासाठी करता येईल. या सूचनेची नोंद घेतली असल्याचे श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी सांगितले.

२) श्री नंदकूमार गोसावी – सभासद क्रमांक ४८७४० – श्री गोसावी यांनी प्रस्तुत विषयाअंतर्गत ७४ व्या वार्षिक अहवालामध्ये नमूद पुढील बाबींचा अधिक तपशील सांगण्याची मागणी केली.

२.१- ७४ व्या वार्षिक अहवालामध्ये पान क्र.२४ वर Borrowings / कर्जे या अंतर्गत सन २०२१-२२ या वर्षअखेरीस रु.३२३.३१ व सन २०२२-२३ या वर्षअखेरीस रु.५५६.०१ कोटी एवढी रक्कम नमूद केली आहे. सन २०२२-२३ या वर्षअखेरीस त्यामध्ये रु.२३२.७० कोटी एवढया रकमेची वाढ दिसत आहे. या वाढीचा तपशील व त्याची कारणे याची माहिती दयावी.

२.२- या वार्षिक अहवालामध्ये पान क्र.२६ वर Other Expenditure / इतर खर्च या सदराखाली क्र.B अंतर्गत Sundry Expenses / किरकोळ खर्च म्हणून सन २०२१-२२ अखेरीस रु.१६.१७ कोटी व सन २०२२-२३ अखेरीस रु.१८.७८ कोटी एवढी रक्कम नमूद आहे. अहवाल वर्षामध्ये

मागील वर्षीचे तुलनेमध्ये रु.२.६१ कोटी एवढया रकमेची वाढ आहे. या वाढीसंदर्भातील तपशीलाची माहिती दयावी.

२.३ – वार्षिक अहवालातील पान क्र.२७ वर क्र.८ मध्ये Excess Provision Written Back / जादा तरतुदी परत या अंतर्गत क्र. A मध्ये Provision For Bad & Doubtful / संशयित व बुडीत कर्जाची तरतूद या अंतर्गत सन २०२१–२२ मध्ये रु.५२.७३ कोटी व सन २०२२–२३ अखेर रु.४७.३६ कोटी एवढी रक्कम दिसते. दोन्हींची मिळून रक्कम रु.१०० कोटी एवढी आहे. ही तरतूद केली नसती तर रु.५३ कोटी एवढया रकमेचा तोटा दिसला असता. या मुद्दयाबाबत माहिती दयावी.

२.४ – वार्षिक अहवालातील पान क्र.२८ वर क्र.१८ मध्ये Provisions & contingencies / तरतुदी अंतर्गत क्र. A मध्ये सन २०२१–२२ या वर्षासाठी रु.७९.८५ कोटी व सन २०२२–२३ या वर्षासाठी रु.६२.३६ कोटी एवढी रक्कम नमूद केली आहे. त्याबृद्दल माहिती दयावी.

२.५ – वार्षिक अहवालातील पान क्र.३९ वर क्र.५ Other Investments मध्ये C अंतर्गत ARC Receipt मध्ये सन २०२१–२२ या वर्षासाठी रु.५०४.३४ कोटी व सन २०२२–२३ या वर्षासाठी रु.४६०.६८ कोटी एवढी रक्कम नमूद केली आहे. त्याबद्दल माहिती दयावी.

२.६ – वार्षिक अहवालातील पान क्र.८२ वर Independent Auditor’s Report मध्ये क्र.९ C मध्ये Doubtful Advances, Non Performing Investments व Other Assets (Non Banking Assets) या अंतर्गत अनुक्रमे रु.२७०.२७ कोटी, रु.३१.१९ कोटी व रु.६४.४८ कोटी एवढी रक्कम नमूद केलेली आहे. त्याबद्दल माहिती दयावी.

२.७ – यापूर्वी निरस्त केलेल्या सुमारे रु.४६० कोटी कर्ज रकमेसंदर्भातील थकीत कर्जदारांची यादी व Top Defaulter List जाहीर करावी.

२.८ – बँकेने कर्ज दिलेल्या Top 100 Defaulter ची यादी मिळावी.

२.९ – बँकेच्या एकूण एनपीएची माहिती वार्षिक अहवालामध्ये नमूद केलेली आहे. तशीच माहिती शाखानिहाय दयावी. एनपीए वसूली संदर्भात पौड रोड शाखेने चांगले काम केल्याचा उल्लेख श्री गोसावी यांनी केला. याच प्रमाणे अन्य शाखांची आकडेवारी मिळाल्यास त्या त्या शाखांमध्ये एनपीएची काय परिस्थिती आहे याची कल्पना मिळेल असे त्यांनी सांगितले.

२.१० – बँकेच्या संचालक मंडळाला उद्देशून यापूर्वी दि.२९.०६.२०२३ रोजी एक पत्र दिलेले आहे. त्यामध्ये विचारलेली माहिती व त्यातील तपशील या सभेमध्ये दयावा अथवा स्वतंत्रपणे नंतर कळवावा असे श्री गोसावी यांनी स्पष्ट केले.

वरील विचारलेली माहिती ही एकत्रित स्वरुपात सर्व प्रश्न विचारुन झाल्यानंतर शेवटी दिली तरी चालेल असे नमूद करुन श्री गोसावी यांनी प्रस्तुत ठराव मंजूर करण्यास हरकत नसल्याचे शेवटी स्पष्ट केले.

३) श्री मुकुंद पुराणिक – सभासद क्रमांक ११०५१८ – प्रस्तुत विषयासंदर्भात त्यांनी पुढील निवेदन केले.

३.१ – अध्यक्षीय मनोगतामध्ये उल्लेख केलेल्या ऑगस्ट २०२२ मध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या काही बाबी हया निश्चीतच कौतुकास्पद असल्या तरी एकूण वर्षअखेरीचा अहवाल हा निराशाजनक वाटतो असे मत व्यक्त केले. अध्यक्षांनी त्यांचे भाषणामध्ये काही उद्दिष्टपुर्तीसाठी जोमाने प्रयत्न केल्याचे सांगितले. त्याच धर्तीवर संपूर्ण आर्थिक वर्षामध्ये प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. भविष्यात व्यवसायामध्ये प्रगती करण्यासाठी खूप जोमाने प्रयत्न करण्याची गरज त्यांनी प्रतिपादीत केली. ३.२ – तसेच वार्षिक अहवालामध्ये पान क्र. १९ वर नमूद केलेला Provision Coverage Ratio (PCR) हा अहवाल वर्षअखेरीस ५३.९५ टक्के असून रिझर्व्ह बँकेचे निर्देशानुसार हा ७० टक्के असणे गरजेचे आहे असे श्री पुराणिक यांनी सांगितले. काही अन्य बँकांमध्ये Provision Coverage Ratio (PCR) हा ९० ते १०० टक्के असूनही निव्वळ नफा तुलनेने जास्त असतो व सभासदांना लाभांश दिला जातो असे नमूद करुन बँकेने या वर्षी आवश्यकते पेक्षा जास्त तरतूदी केल्या आहेत असेही विधान केले.

३.३ – सन २०२३–२४ चे व्यवसायाचे अंदाजपत्रक हे सहजसाध्य व किमान पातळीवरील असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे प्रयत्नपुर्वक अधिक व्यवसाय करुन कठोर मेहनत घेतल्यास ते लाभदायक ठरेल असे मत मांडले.

3.4 - Provision Coverage Ratio (PCR) ९० टक्क्यांपर्यत वाढवून उर्वरित निव्वळ नफयातून काही लाभांश नजीकचे वर्षांमध्ये मिळावा अशी अपेक्षा त्यांनी शेवटी व्यक्त केली.

वरील प्रश्नांची माहिती ही सर्वात शेवटी एकत्रित स्वरुपात दयावी व ठराव मंजूर करणेस हरकत नाही असे श्री पुराणिक यांनी शेवटी सांगितले.

४. श्री मुकुंद गोविंद जोशी – सभासद क्रमांक १०६४०६ – श्री मुकुंद गोविंद जोशी यांनी प्रस्तुत विषयासंदर्भात पुढील निवेदन दिले.

४.१ – सभासदांना पुढील वर्षी तरी लाभांश मिळावा. काही सभासदांना लाभांश नको असल्यास त्याची रक्कम बँकेला पुर्नसमर्पित करण्याची सुविधा उपलब्ध असावी अशी सूचना केली.

४.२ – सभेच्या ठिकाणाहून १०० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावरुन येणा–या सभासदांना त्यांचे राहत्या ठिकाणाहून सभास्थानी येण्या जाण्याचा खर्च मिळावा अशीही मागणी त्यांनी केली. तसेच यासंदर्भात

कायदयामध्ये तरतूद नसलीतरी अशा प्रकारच्या खर्चाची रक्कम तुलनेने जास्त नसल्यामुळे त्याचा ताळेबंदावर परिणाम जाणवणार नाही असे मत व्यक्त केले.

४.३ संचालक मंडळावर सेवकांचा प्रतिनिधी असावा अशी सूचना केली.

५. श्री सुधाकर पांडुरंग वाणी – सभासद क्रमांक १७२० – प्रस्तुत विषयासंदर्भात त्यांनी पुढीलप्रमाणे माहिति देण्याची मागणी केली.

५.१ – वार्षिक अहवालामध्ये नमूद भाग भांडवलात फारशी वाढ ही अहवाल वर्षामध्ये दिसून येत नाही. त्याबद्दल विवेचन करावे. तसेच कर्जामध्ये झालेल्या वाढीचे तुलनेत देखील भाग भांडवल वाढ झालेली नाही असे मत व्यक्त केले.

५.२ – कर्ज व्यवसाय वाढ ही रु.३४४.०७ कोटी म्हणजेच ७.२१ टक्के झाल्याचे वार्षिक अहवालामध्ये नमूद आहे. त्याचे १ ते २ टक्के एवढी किमान वाढ भाग भांडवलामध्ये होणे अपेक्षित होते. अशी वाढ न झाल्याची कारणे विशद करावीत अशी मागणी श्री वाणी यांनी केली.

५.३ – तसेच सन २०२३-२४ या वर्षाचे उद्दिष्ट घेताना भाग भांडवल वाढ ही २ टक्के एवढी घेतली आहे. अन्य बँकांचे उदाहरण देवून त्यांनी ही वाढ किमान ५ ते ७ टक्के असावी असे मत त्यांनी व्यक्त केले.

५.४ – मागील ४ ते ५ वर्षाच्या अनुभवानुसार बँकेने निर्धारित केलेले एनपीए व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी तपासणीअंती निर्धारित केलेला एनपीए हयामध्ये फरक पडतो. सातत्याने अशी विसंगती असण्याची कारणे विशद करावीत अशी मागणी श्री वाणी यांनी केली.

५.५ – वार्षिक अहवालामध्ये बँकेने वास्तववादी माहिती दयावी असे सर्वसाधारण मत शेवटी श्री वाणी यांनी व्यक्त केले.

६. श्री अशोक विष्णू समुद्र – सभासद क्रमांक १९६८६८ – प्रस्तुत विषयावर श्री समुद्र यांनी अहवाल वर्षामध्ये बँकेने मोठी प्रगती केली असल्याचे मत व्यक्त केले. त्याचे पुष्टयर्थ त्यांनी ठेव वाढ, कर्ज वाढ, कासा ठेव वाढ, एनपीए ची कमी झालेली आकडेवारी, वसूलीची आकडेवारी, कॅास्ट ऑफ डिपॅाझिटमध्ये झालेली घट, सीडी रेशोमध्ये झालेली वाढ, परिचलनात्मक नफ्यामध्ये झालेली वाढ, निव्वळ नफ्यामध्ये झालेली वाढ, निरस्त कर्ज खात्यावरील वसूलीमध्ये झालेली वाढ, गुंतवणूकीमध्ये झालेली वाढ इत्यादि तपशील नमूद केला. तसेच Provision Coverage Ratio (PCR) हा निकषाप्रत नसला तरी त्यामध्ये मागील वर्षीचे तुलनेमध्ये सुधारणा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले तसेच बँकेचे एकूण आर्थिक चित्र हे सकारात्मक सुधारणा दर्शवित असल्याचेही त्यांनी सांगितले.

७. श्रीमती सूषमा फडके – सभासद क्रमांक ८९५०८ – श्रीमती फडके यांनी ज्येष्ठ नागरिक यांचेकरिता काही सेवा विनाशुल्क पुरवाव्यात व त्याचा तपशील सांगावा अशी सूचना केली. त्यांचेही सूचनेची नोंद घेण्यात आली.

८. श्री मिलींद भिडे – सभासद क्रमांक ३९६४० – श्री भिडे यांनी Branch Adjustment याबाबत माहिती दयावी अशी मागणी केली.

यासंदर्भात अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी अन्य सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का तसेच संबंधित सभासदांनी विचारलेली माहिती ही एकदम दिली तर चालेल का अशी विचारणा केली. त्यावर सभासदांनी सर्व विषयांवरील माहिती एकदम दिली तरी चालेल असे सांगितले. तसेच अन्य कोणीही सभासदांनी यांनी प्रस्तुत विषयावर वरील चर्चेनंतर भाष्य केले नाही अथवा अधिक माहिती विचारली नाही.

तदनंतर प्रस्तुत विषयासंदर्भात पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्रमांक २** – रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकानुसार दि.३१.०३.२०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, त्यावरील विविध प्रगटने मंजूर करुन पुढीलप्रमाणे नफा विभागणी करणेस मान्यता देण्यात येत आहे आहे व वैधानिक लेखा परिक्षक यांच्या अहवालाची नोंद घेण्यात येत आहे.

**मंजूर केलेल्या नफा विभागणीचा तपशील**

| अक्र | नफा विभागणी तपशील | रक्कम रुपये कोटींमध्ये |
|---|---|---|
| १ | विधी विहीत गंगाजळी / Statutory Reserves | २.०३ |
| २ | आकस्मिक खर्चासाठी तरतूद / Provision for Contingency Expenses | ०.८१ |
| ३ | शैक्षणिक निधी / Education Fund | ०.०८ |
| ४ | निव्वळ नफा ताळेबंदा वर्ग / Net Profit transferred to Balance Sheet | ५.२१ |
| | एकूण / Total | ८.१३ |

सूचक – सीए श्री मंदार सदाशिव लेले
सभासद क्रमांक – ७१९१५

अनुमोदक – सीए श्री माधव रामकृष्ण माटे
सभासद क्रमांक – ८२०१४

तदनंतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्र. ३** – सन २०२३–२४ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे.

आर्थिक वर्ष सन २०२३–२४ चे वार्षिक अंदाजपत्रक हे मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्ट २००२ चे कलम क्र.३९ जी नुसार वार्षिक अहवालामध्ये पान क्र. ७८ येथे तसेच छापील रंगीत पुस्तिकेमध्ये देखील पान क्र.१७ वर विदित केले. तसेच त्याचा तपशील सभासदांना सांगण्यात आला तसेच तो स्टेजवरील स्क्रीनवर देखील दाखविण्यात आला.

यासंदर्भात अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का अशी विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत विषयावर पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

१. श्री मुकुंद पुराणिक – सभासद क्रमांक ११०५१८ – प्रस्तुत विषयासंदर्भात त्यांनी पुढील निवेदन केले.
   सन २०२३–२४ चे वार्षिक अंदाजपत्रक किमान पातळीवरील आहे. बँकेची क्षमता ही त्यापेक्षा निश्चीतच जास्त आहे. त्यामुळे अल्पसंतुष्ट न राहता या अंदाजपत्रकापेक्षा जास्त व्यवसाय करण्याचा नक्कीच प्रयत्न करावा.
   त्यांचे सूचनेची नोंद घेण्यात आली.
   त्यानंतर कोणत्याही सभासदाने चर्चा अथवा मागणी मांडली नाही. तदनंतर प्रस्तुत विषयासंदर्भात पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्रमांक ३** – ठराव करण्यात येतो की, सन २०२३–२४ च्या वार्षिक अंदाजपत्रकाची नोंद घेवून त्यास ही सभा मान्यता देत आहे.

| | |
|---|---|
| सूचक – श्री अमित यशवंत घैसास | अनुमोदक – सीए श्री किसन राघू खाणेकर |
| सभासद क्रमांक – १९६८८९ | सभासद क्रमांक – ५१०३१ |

त्यावर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्रमांक ४** – रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व मान्यतेनुसार तसेच मल्टिस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्ट २००२ मधील कलम ७० व ७१ नुसार वैधानिक लेखा परिक्षकांची नव्याने नियुक्ती करणे, पुनर्नियुक्ती करणे, नियुक्ती रद्द करणे व त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे

यासंदर्भात अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का अशी विचारणा केली. परंतू कोणत्याही सभासदाने प्रस्तुत विषयावर चर्चा अथवा अधिक माहिती मागितली नाही. तदनंतर प्रस्तुत विषयासंदर्भात पुढील ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्रमांक ४** – ठराव करण्यात येतो की, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व मान्यतेनुसार तसेच मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ मधील कलम ७० व ७१ नुसार वैधानिक लेखा परिक्षकांची नव्याने नियुक्ती करणे, पुनर्नियुक्ती करणे, नियुक्ती रद्द करणे व त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देण्यात येत आहेत.

सूचक – सीए श्री किरण वासुदेव गांधी | अनुमोदक – श्री मकरंद मोरेश्वर अभ्यंकर

सभासद क्रमांक – १५७८९८ | सभासद क्रमांक – १९०१७४

श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्रमांक ५** – बँकेच्या संचालकांना व त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये दिलेल्या कर्जाची मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ कलम ३९ (३) नुसार माहिती घेणे.

प्रस्तुत विषयाचा माहिती वजा तक्ता छापील रंगीत पुस्तिकेतील पान क्रमांक १८ व १९ मध्ये सभासदांचे अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आला होता. तसेच सर्व उपस्थित सदस्यांना हा तक्ता पुन्हा स्टेजजवळील दोन्ही स्क्रीन्सवर दाखविण्यात आला. सभासदांनी या विषयावर चर्चा अथवा अधिक माहिती मागितली नाही.

यासंदर्भात अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का ? याबाबत उपस्थित सभासद यांना विचारणा केली. परंतू कोणत्याही सभासदाने त्यावर सूचना केली नाही. त्यानंतर प्रस्तुत विषयावर पुढीलप्रमाणे ठराव सादर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ५** – ठराव करण्यात येतो की, बँकेच्या संचालकांना व त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये दिलेल्या कर्जाची मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ कलम ३९ (३) नुसार सादर करण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येत आहे.

सूचक – श्री श्रीरंग दत्तात्रय परस्पाटकी | अनुमोदक – श्री कानिफनाथ रोहिदास भगत

सभासद क्रमांक – १११६८९ | सभासद क्रमांक – ९४८५०

श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्रमांक ६** – धर्मादाय / सार्वजनिक कारणासाठी अंशदान निधीतून संस्थांना देणगी देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणे.

प्रस्तुत विषयासंदर्भात अशा प्रकारे सन २०२२-२३ या वर्षामध्ये कोणत्याही धर्मादाय / सार्वजनिक कारणासाठी अंशदान निधीतून संस्थाना देणगी दिली नसल्याची माहिती देण्यात आली.

तदनंतर अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का तसेच प्रस्तुत ठराव मंजूर अथवा नामंजूर याबाबत उपस्थित सभासद यांना विचारणा केली. परंतू कोणत्याही सभासदाने याबाबत माहिती मागितली नाही अथवा सूचना केली नाही. तदनंतर या विषयासंदर्भात पुढीलप्रमाणे ठराव सादर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ६** – ठराव करण्यात येतो की, धर्मादाय / सार्वजनिक कारणासाठी अंशदान निधीतून संस्थांना देणगी देणेबाबतचे प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. तसेच अशा प्रकारे कोणतीही देणगी दिलेली नसल्याची नोंद घेत आहे.

सूचक – श्री मिलींद मधुकर लिमये — अनुमोदक – श्री प्रभाकर त्रिंबक परांजपे

सभासद क्रमांक – ८७६९३ — सभासद क्रमांक – १५८७१८

श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्रमांक ७** – मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ कलम क्र.२९ (सी) नुसार सदर वार्षिक सर्वसाधारण सभेत अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या रजेला मंजूरी देणे.

तदनंतर अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का ? याबाबत उपस्थित सभासद यांना विचारणा केली. परंतू कोणत्याही सभासदाने त्यावर सूचना केली नाही. तदनंतर प्रस्तुत विषयासंदर्भात पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्रमांक ७** – ठराव करण्यात येतो की, सदर वार्षिक सर्वसाधारण सभेत अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या रजेला ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक – श्री श्रीकांत सर्जेराव पोतनीस — अनुमोदक – श्री रघुराज बालाप्रसाद बाहेती

सभासद क्रमांक – ९५६०३ — सभासद क्रमांक – ४०९५२

श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**विषय क्रमांक ८** – अध्यक्षांचे अनुमतीने आयत्या वेळचे विषय.

विषय क्रमांक – ८/१ – संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या सेवकांच्या तपशीलाची नोंद घेणे.

श्री मंदार श्रीराम फाटक सभासद क्रमांक – ४०२३३ यांनी प्रस्तुत विषय हा आयत्या वेळचा विषय म्हणून मांडणेस अनुमती देण्याची विनंती श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांना केली. त्यावर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी हा विषय मांडणेची अनुमती श्री मंदार श्रीराम फाटक यांना दिली.

त्यानुसार श्री मंदार श्रीराम फाटक यांनी प्रस्तुत विषयासंदर्भाने संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या सेवकांचा तपशील दि.३१.०३.२०२३ अखेरीस निरंक असल्याचे सांगितले. तसेच याची माहिती ही छापील रंगीत पुस्तिकेमध्ये पान क्र.२० वर सभासदांचे अवलोकनार्थ देण्यात आली व ती स्टेजसमोरील स्क्रीनवर देखील दाखविण्यात आली.

तदनंतर अध्यक्ष श्री रविंद्र हेजीब यांनी सभासदांना यावर काही बोलावयाचे आहे का ? असे विचारले. परंतू कोणत्याही सभासदाने त्यावर सूचना केली नाही. तदनंतर पुढीलप्रमाणे ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्रमांक ८/१** – ठराव करण्यात येतो की, दि.३१.०३.२०२३ अखेरील संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या सेवकांचा तपशील निरंक असून त्याची नोंद घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सूचक – श्री मंदार श्रीराम फाटक | अनुमोदक – ॲड सौ अलका विजय पेटकर |
| सभासद क्रमांक – ४०२३३ | सभासद क्रमांक – १२०२१५ |

श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी वरील ठराव मंजूर अथवा नामंजूर याविषयी सभासदांना विचारणा केली. तदनंतर प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांनी वरील ठराव सर्वानुमते मंजूर केला.

यानंतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी सभासदांना अध्यक्षांचे अनुमतीने आयत्या वेळच्या विषयाअंतर्गत काही विषय मांडावयाचे असल्यास ते मांडावेत असे आवाहन केले. परंतू कोणत्याही सभासदाने अध्यक्षांचे अनुमतीने आयत्या वेळच्या विषयाअंतर्गत विषय मांडले नाहीत.

तदनंतर काही सभासदांनी अन्य विषयावर सूचना व्यक्त केल्या तसेच माहिती देण्याची सूचना केली. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१. श्री हेमंत दिगंबर नागपूरकर – सभासद क्रमांक १९४८७६ – श्री नागपूरकर यांनी अटल पेन्शन योजनेअंतर्गत बँकेने केलेल्या कामगिरीचे कौतुक केले व त्याबद्दल सर्व संचालक व सेवक यांचे अभिनंदन केले. तसेच श्री नागपूरकर यांनी ते पणन क्षेत्राशी संबंधित असून एकंदरीत बाजारामध्ये बँकेचे नांव चांगले असल्याचे मत व्यक्त केले.

२. श्री अनिल रघुनाथ गचके – सभासद क्रमांक ५२७०४ – श्री गचके यांनी पुढील प्रश्न विचारले.

२.१ – सन २०२३ अखेरील आर्थिक वर्षाचा ताळेबंद बँकेचा एकंदर आवाका विचारात घेता योग्य आहे का अशी विचारणा केली व त्यावर संचालक मंडळाने अभ्यास करावा असे मत व्यक्त केले.

२.२ – अन्य बँका उदा. सारस्वत बँक, ठाणे जनता सहकारी बँक इत्यादि प्रमाणे संचालक मंडळावर तज्ञ व्यक्ती घेऊन बँकेच्या आर्थिक कामगिरीमध्ये कशा प्रकारे सुधारणा करता येतील याबाबत त्यांचे मत व्यक्त केले. यासंदर्भात त्यांनी अन्य बॅकांची तुलनात्मक माहिती देण्यास सुरुवात केली असता त्यावर काही सभासदांनी आक्षेप घेवून आपल्या बँकेविषयी मत व्यक्त करावे असे सांगितले. यावर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष, यांनी श्री गचके यांना त्यांचे मत मांडणेस सांगितले. त्यावर श्री गचके यांनी इतर बँकामध्ये वेगवेगळया पदावर नावाजलेल्या व्यक्ती कार्यरत आहेत. त्यांचे अनुभवाचा परिणाम व ज्ञानाचा परिणाम हा बँकाच्या कामगिरीवर दिसतो असे सांगितले.

२.३ – तसेच अन्य बँकाप्रमाणे बँकेच्या सेवेमध्ये बाहेरुन चार्टड अकौन्टटस, कंपनी सेक्रेटरी इत्यादि पात्रता असलेले उमेदवार घ्यावेत जेणेकरुन त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा बँकेला होईल असे सांगितले.

३. ॲड श्री महेंद्र उत्तमराव तुपे – सभासद क्रमांक २१२५२५ – ॲड तुपे यांनी अहवाल वर्षामध्ये बँकेला मिळालेल्या दोन पुरस्कारां संदर्भात सर्व संचालक व सेवकांचे अभिनंदन केले.

४. श्री नारायण विनायकराव थेटे – सभासद क्रमांक ६८३२८ – श्री थेटे यांनी अहवाल वर्षामध्ये केलेल्या कामगिरीबद्दल संचालक मंडळाचे हार्दिक अभिनंदन केले. तदनंतर त्यांनी सर्वांगीण प्रगतीसाठी ग्राहक सेवेमधील त्रूटींचा विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणा–या बैठक, सेवकांचे ग्राहकांशी सौदार्हपुर्ण संबंध इत्यादि संदर्भातील त्रूटींचा अभ्यास करावा तसेच सेवेमध्ये कमतरता निदर्शनास आल्यास संबंधित सेवकाला शासन करावे असे मत मांडले. यासंदर्भात त्यांनी सहकारनगर शाखेमध्ये त्यांना आलेल्या कटू अनुभवाचे उदाहरण नमूद केले. त्यावर सभेमध्ये उपस्थित असलेल्या सहकार नगर शाखेमधील अन्य खातेदार सभासद यांनी सहकार नगर शाखेमधील ग्राहक सेवा ही अतिशय चांगली असल्याचे नमूद करुन श्री थेटे यांनी नमूद केलेला त्यांचा अनुभव हा त्यांचे वैयक्तिक समस्येशी निगडीत असल्याचे मत व्यक्त केले.

५. श्री रमेश वामन सप्रे – सभासद क्रमांक – ४४४८४ – श्री सप्रे यांनी खेडोपाडी पातळीवर जनता बँक चांगले काम करत असून त्याबद्दल त्यांनी संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच त्यांनी सेवानिवृत्त खातेदारांना मिनिमम बॅलन्स मर्यादा कमी असावी तसेच गरजेनुसार देवरुख शाखेमध्ये जादा पासबूक प्रिंटरची व्यवस्था करावी अशी सूचना केली.

६. श्री मिलींद भिडे – सभासद क्रमांक २९६४० – श्री भिडे यांनी खर्चात कपात करण्याचे दृष्टीने बँकेने काय प्रयत्न केले व त्यानुसार खर्चामध्ये प्रत्यक्ष झालेली कपात याचा तपशील वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट करावा अशी सूचना केली.

७. श्री लक्ष्मण अंबूसा पवार – सभासद क्रमांक ११५१४ – श्री पवार यांनी सभेमध्ये चांगल्या प्रकारे विविध विषयांवर विश्लेषण झाल्याचे मत व्यक्त केले.

८. श्री भास्कर शामराव चिल्लाळ – सभासद क्रमांक १५८२६८ – श्री चिल्लाळ यांनी श्री थेटे यांनी व्यक्त केलेल्या मताबाबत असहमती व्यक्त केली. तसेच बँकेचे सर्व संचालक, सर्व सेवक व सभासद हे निरलसपणे काम करत असल्याचे मत व्यक्त केले. तसेच श्री चिल्लाळ यांनी अमृत महोत्सवी वर्षामध्ये बँकेने एखादी योजना जाहीर करावी असे सांगितले.

९. ॲड श्री सागर शामराव सातपुते – सभासद क्रमांक – २०६३०२ – श्री सातपुते यांनीही श्री थेटे यांनी व्यक्त केलेले मत हे चूकीचे असल्याचे नमूद केले. तसेच ॲड सातपुते यांनी छोटी कर्ज वाढ करण्यासाठी बँकेने केलेल्या प्रयत्नांचे विवेचन करण्याची सूचना केली.

१०. श्री जगदीश लक्ष्मणराव कदम – सभासद क्रमांक ५१०६ – श्री कदम यांनी बँकेच्या आगामी अमृत महोत्सवी वर्षाचे पार्श्वभूमीवर सर्व प्रथम अभिनंदन केले व त्याचा चांगला आराखडा तयार करावा व प्रत्येक शाखेमध्ये जाऊन वेगवेगळे उपक्रम करावेत व बँकेची प्रतिमा उजळून निघावी अशी सूचना केली. तसेच श्री कदम यांनी अन्य बँकांच्या बरोबर सभासदांनी त्यांचे मत व्यक्त करताना जनता बँकेची तुलना करु नये असे मत व्यक्त केले.

११. श्री राजीव मराठे – सभासद क्रमांक १७२४५७ – श्री मराठे यांनी बँकेने शाखा वाढीसाठी व अमृत महोत्सवानिमित्त करणार असलेल्या उपक्रमांची माहिती दयावी असे सांगितले.

१२. श्री राघवेंद्र व्यंकटेश देशपांडे – सभासद क्रमांक १९५०८४ – श्री देशपांडे यांनी ज्या खातेदार सभासदांनी काही कार्बन क्रेडीट यावर काम केले असेल त्यांना व शेतकरी वर्गाला विशेष सुविधा दयाव्यात असे मत व्यक्त केले.

१३. श्री आशिष मानकर – सभासद क्रमांक ७९९७८ – श्री मानकर यांनी बँकेच्या अमृत महोत्सवामध्ये जनता बँकेने पुढाकार घेवून सहकार परिवारातील काही बॅंकांचे एकत्रीकरण करता येईल का हे पहावे अशी सूचना केली.

१४. श्री सुज्ञानंद सुशीलेंद्र पंचमुखी – सभासद क्रमांक १३४१०९ – श्री पंचमुखी यांनी जनता बँक ही मल्टीस्टेट बँक असून अन्य विशेषतः गूजराथ राज्य येथे बँकेच्या अजून काही नवीन शाखा उघडाव्यात अशी सूचना केली.

१५. श्री शशीकांत चंद्रचूड – सभासद क्रमांक १९३१६८ – श्री चंद्रचूड यांनी सहकार नगर शाखेने ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जावून खाती उघडून ठेवी व अन्य सेवा मिळत असल्याचे नमूद केले. यासंदर्भात त्यांनी त्यांचे मागील अनुभव कथित केले. तसेच शाखाशः सभासदांचे मेळावे घेण्याची सूचना केली.

१६. श्री बद्रीनाथ गोपीनाथ मुर्ती – सभासद क्रमांक ४०८८१ – श्री मुर्ती यांनी बँकेच्या वार्षिक अहवालामध्ये अॅचीव्हमेंटस अॅन्ड सक्सेस स्टोरीज याबद्दल तपशील देण्याची सूचना केली. तसेच त्यांनी बँकेच्या अडचणीच्या काळामध्ये ज्या सभासदांनी व सेवकांनी बँकेला मदत केली त्याचा उल्लेख अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या सादरीकरणामध्ये करण्याची सूचना केली.

१७. श्री विजय भालेराव – सभासद क्रमांक २०४६६ – श्री भालेराव यांनी बँक प्रगती निश्चित करत आहे परंतू त्याचा वेग थोडा कमी असू शकेल असे मत व्यक्त केले. तसेच श्री भालेराव यांनी ज्या शहरांमध्ये बँकेच्या शाखा नाहीत तेथील अन्य कमकूवत बँकाचे विलीनीकरण जनता बँकेमध्ये केल्यास वेगाने व्यवसाय वाढ होईल असे मत व्यक्त केले. तसेच पुढील काळामधील गरजेनुसार काही जादा सेवक सेवेत घेवून त्यांना प्रशिक्षण देण्याची सूचना केली.

१८. श्री हरेराम सोवनी – सभासद क्रमांक ७६१३२ – श्री सोवनी यांनी बँकेने गरजेनुसार उच्चशिक्षित व्यक्तींचा सल्ला घ्यावा अशी सूचना केली.

१९. श्री राजीव रामचंद्र हिरवे – सभासद क्रमांक ३१३०१ – बँकेने केलेल्या कामगिरीबद्दल समाधानी असल्याचे त्यांनी नमूद करुन सर्व संचालक व सेवकांचे अभिनंदन केले. तसेच प्रगतीसाठी एकजूटीने प्रयत्न आवश्यक असतात असे सांगितले. तसेच अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एखादी योजना जाहीर करावी अशी सूचना केली.

२०. श्री दीपक नाथाजी माने – सभासद क्रमांक ९५२०६ – अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांचे शाखानिहाय छोटे मेळावे व्हावेत असे मत व्यक्त केले. तसेच बँकेसाठी स्वतंत्र जनसंपर्क अधिकारी असावा असे मत व्यक्त केले.

२१. सौ द्वारका किशोरकूमार मांदळे – सभासद क्रमांक १३८६०५ – सौ मांदळे यांनी मागील २० वर्षामध्ये बँकेने दिलेल्या सेवेबद्दल आभार मानले व जनता बँक ही आपली बँक असल्याचे सांगितले.

तदनंतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी अजून कोणा सभासदांना काही माहिती अथवा प्रश्न विचारावयाचे असल्यास विचारावेत असे आवाहन केले. परंतू कोणत्याही सभासदाने नवीन प्रश्न विचारले नाहीत. तदनंतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी श्री जगदीश पुरुषोत्तम कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना तसेच केलेल्या सूचनांसंदर्भात एकत्रित उत्तर देणेची सूचना केली.

त्यानुसार सभासदांनी विचारलेले प्रश्न व माहिती याचा तपशील श्री.जगदीश पुरुषोत्तम कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विषद करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये मुख्यत्वे पुढील बाबींचा समावेश त्यांनी केला.

- सर्वप्रथम बँकेच्या ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित असलेल्या सभासद बंधू भगिनींचे त्यांनी स्वागत केले व आभार मानले.
- सभेच्या विषयपत्रिकेमध्ये नमूद केलेल्या विषयांवर तसेच आयत्या वेळच्या विषयांअंतर्गत सभासदांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे, दुरुस्त्यांचे व सूचनांचे त्यांनी स्वागत केले.
- विविध सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना त्यांनी सर्वप्रथम श्री मुकुंद जोशी, श्री श्रीकांत साठे, श्री नंदकुमार गोसावी, श्री सुधाकर वाणी, श्री अनिल व्यास, श्री अरविंद करंबेळकर, श्री मुकुंद पुराणिक, श्री अनिल गचके, श्री मोहन गोखले, श्री श्रीराम रायकर इत्यादि काही सभासद यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांचे सत्कार करु नयेत याबाबत बँकेला लेखी सूचना केली असल्याचे सांगितले. या सभासदांनी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अ‍ॅक्ट २००२ मध्ये नमूद केल्यानुसार स्थगित सभेचे कामकाजासंदर्भातील निर्देश बँकेला पाठविले होते. यावर उत्तर देताना या निर्देशांची बँकेला माहिती आहे मात्र मागील कालावधीमध्ये झालेले सत्कार हे ज्या सभासदांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा सभासदांचे सत्कार बँकेने केले असे सांगितले. तसेच त्याबाबतची मानसिकता नमूद करताना श्री कश्यप यांनी सांगितले की सत्कार समारंभातून श्री जोशी यांनी नमूद केल्यानुसार बँकेला कोणताही आर्थिक फायदा होत नसला तरी सहकारी संस्थांचा उद्देश हा केवळ नफा कमाविणे हा नसतो. उलटपक्षी यातून सर्व सभासदांचा विकास व्हावा तसेच ज्या सभासदांनी उल्लेखनीय कामगिरी केली असेल त्यांचे सर्वसाधारण सभेच्या व्यासपीठावर कौतूक व्हावे, होतकरु सभासदांना त्यातून प्रेरणा मिळावी व त्यांचे विकासाला चालना मिळावी असे सकारात्मक हेतूही असतात. मात्र श्री जोशी व अन्य काही सभासद यांनी दि.२६.०५.२०२३ रोजीचे पत्राने बँकेला केलेल्या सत्कार समारंभ विषयक सूचनेची नोंद घेतली आहे असे सांगितले. तसेच त्याउलट काही सभासदांनी मागील वर्षांप्रमाणेचे सभासदांचे सत्कार समारंभ सर्वसाधारण सभेमध्ये जरुर असावेत असेही मत बँकेकडे व्यक्त केले असल्याचेही आवर्जुन नमूद केले.

त्यानंतर श्री कश्यप यांनी सभेमध्ये विविध सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांसंबंधी तसेच केलेल्या सूचनेसंदर्भात माहिती सांगण्यास सुरुवात केली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

१. श्री मुकुंद जोशी यांनी पुढील वर्षी लाभांश मिळावा अशी मागणी केली होती. तसेच काही सभासदांना लाभांश नको असल्यास ती रक्कम बँकेला समर्पित करणेचा पर्याय उपलब्ध करुन दयावा अशी सूचना केली होती. त्याचप्रमाणे बाहेरगावाहून सभेला येणा–या सभासदांना प्रवास खर्चाची रक्कम देण्याची मागणी केली होती. संचालक मंडळावर सेवक प्रतिनिधी असावा अशी सूचनाही त्यांनी केली होती.

त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी संचालक मंडळावर सेवक प्रतिनिधी नेमावा अशी सूचना श्री मुकुंद जोशी यांचे प्रमाणेच श्री श्रीकांत साठे, श्री नंदकुमार गोसावी इत्यादि अन्य सभासदांनी केली असून त्यास एकत्रित विस्तृत उत्तर देत असल्याचे सांगितले.

तसेच लाभांश मिळणे व काही सभासदांना तो नको असल्यास त्याची रक्कम बँकेला समर्पित करणेचा पर्याय उपलब्ध करुन दयावा याविषयीचे श्री जोशी यांचे सुचनेला उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की , रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तसेच मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट २००२ मध्ये नमूद केलेल्या तरतूदींचा विचार लाभांश देताना करावा लागतो. त्यानुसार अहवाल वर्षासाठी लाभांश प्रस्तावित केलेला नाही. मात्र चालू आर्थिक वर्ष अखेरीस म्हणजेच दि.३१.०३.२०२४ अखेर लाभांश देण्यासाठी बँक सर्वकष प्रयत्न करेल असे सांगितले.

बँकेने चांगला व निकोप व्यवसाय करुन सभासदांना पुढील कालावधीमध्ये योग्य पध्दतीने व निरंतर लाभांश देण्यासाठी योजना करण्याचा संचालक मंडळ व सर्व अधिका–यांनी प्रयत्न केला असून त्याला काही प्रमाणात यश आले आहे. तसेच बहुतेक सर्व आर्थिक आघाडयांवर यश प्राप्त करण्याचा प्रयत्न अहवाल वर्षामध्ये केलेला असून चालू आर्थिक वर्षामध्ये जोरदार प्रयत्न करुन यामध्ये अधिकाधिक यश संपादन करण्याचा बँकेचा प्रयत्न राहील असे प्रतिपादन श्री कश्यप यांनी केले.

श्री जोशी यांनी केलेल्या खर्चासंबंधीचे सुचनेवर उत्तर देताना संबंधित कायदयातील तरतूदींचा विचार करता श्री कश्यप यांनी अशा प्रकारे प्रवास खर्चाची रक्कम बाहेरगांवाहून येणा–या सभासदांना देणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले.

२. श्री मुकुंद पुराणिक यांनी बँकेने व्यावसायिक प्रगती करण्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करण्याची सूचना केली होती. तसेच त्यांनी अहवाल वर्षातील प्रोव्हिजन कव्हरेज रेशो याचे उदाहरण दिलेले होते. त्याचप्रमाणे सन २०२३–२४ चे अंदाजपत्रक हे किमान पातळीवरील व सहजसाध्य असल्याचे मत व्यक्त केले व बँकेने अधिक प्रयत्न करुन त्यापेक्षा जास्त व्यवसाय उद्दिष्ट साध्य करावे असे सांगितले होते. अशाच प्रकारची सूचना श्री अनिल गचके यांनीसुध्दा केली होती.

श्री मुकुंद पुराणिक व श्री अनिल गचके या दोन्ही सभासदांनी केलेल्या सूचनांना उत्तर देताना श्री कश्यप यांनी बँकेने व्यवसाय विस्तार करताना जोखमीच्या बाबीं कमी व्हाव्यात यासाठी संयमित व चिकित्सक पध्दत अवलंबिली आहे व त्यामुळे विकासाचा वेग थोडा कमी राहू शकतो असे सांगितले. तसेच वार्षिक अहवालामध्ये नमूद केलेले अंदाजपत्रक गाठण्याचा सर्व सेवक कसोशीने प्रयत्न करतील असा विश्वासही व्यक्त केला.

३. श्री अनिल गचके यांनी बँकेच्या संचालक मंडळामध्ये तज्ञ व्यक्ती असाव्यात अशी सूचना केली होती. तसेच बँकेच्या सेवेमध्ये देखील अशा व्यावसायिक पात्रता असलेले उमेदवार घ्यावेत असे मत व्यक्त केले होते. त्याच प्रकारे ताळेबंदामध्ये काय सुधारणा करता येतील याचा अभ्यास बँकेने करावा असे सांगितले होते.

त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी बँकेच्या संचालक मंडळावर ४ सनदी लेखापाल, १ ॲडव्होकेट, ४ बँकर्स, ३ प्रथितयश व्यावसायिक, १ माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच रिझर्व्ह बँक अधिकारी यांनी देखील बँकेच्या संचालक मंडळावर अशा प्रकारे जास्त संख्येने प्रोफेशनल डायरेक्टर्स असल्याबद्दल अनुकूल मत व्यक्त केले आहे. संचालक मंडळावर ५१ टक्के प्रोफेशनल डायरेक्टर्स असावेत ही रिझर्व्ह बँकेची अपेक्षा आहे. त्याचे तुलनेमध्ये बँक करत असलेली पुर्तता ही ९६ टक्के आहे. त्याच प्रमाणे बँकेच्या व्यवस्थापकीय मंडळावर (Board Of Management) माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, व्यवस्थापन, विधी वसूली इत्यादि क्षेत्रातील प्रथितयश व्यक्ती संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या आहेत. त्यांचेकडून चांगल्या प्रकारे मार्गदर्शन व सूचना विविध विषयांवर केल्या जातात. त्याच प्रमाणे बँकेतील बहूतेक सर्व अधिकारी यांना बँकिंग क्षेत्रामध्ये चांगला अनुभव असून त्यापैकी अनेक अधिकारी हे व्यावसायिक पात्रता सुध्दा धारण करत आहेत अशी माहिती श्री कश्यप यांनी दिली. सबब श्री गचके यांची सूचना पुर्वीपासूनच अंमलात आणली असल्याचे नमूद केले.

श्री गचके यांचे ताळेबंदातील सुधारणा या सुचनेला उत्तर देताना श्री कश्यप यांनी अन्य बँकामध्ये काही चांगल्या योजना, सोई, सुविधा याचा अभ्यास करुन पुढच्या वर्षीच्या ताळेबंदामध्ये अधिक काय प्रयत्न करता येईल याविषयी नक्की प्रयत्न करु असे आश्वासित केले.

४. श्री सुधाकर वाणी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभासदांना पाठविण्याची सूचना केली होती. ही सूचना स्तुत्य असल्याचे नमूद करुन या सभेला उपस्थित असलेल्या सभासदांना ईमेलद्वारे सभेचे इतिवृत्त पाठविण्याची व्यवस्था केली जाईल असे श्री कश्यप यांनी सांगितले.

श्री वाणी यांनी लेखा परिक्षण पुर्ण झाल्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजना संबंधी केलेल्या सूचनेवर उत्तर देताना श्री कश्यप यांनी या वर्षी वैधानिक लेखा परिक्षण पुर्ण झाल्यावर वार्षिक सर्वसाधारण सभेचे नियोजन बँकेने

केले होते परंतू दरम्यानचे कालावधीमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे इन्स्पेक्शन सुरु असल्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेचे नियोजन पुढे ढकलावे लागले असे सांगितले.

श्री वाणी यांचे भाग भांडवल वाढ नसल्याचे निरीक्षणाला उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, पुर्वीचे तुलनेमध्ये बँकेचा CRAR हा आता १२ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार १२ टक्क्यांपेक्षा CRAR जास्त असल्यामुळे कर्जाचे तुलनेमध्ये भाग भांडवल घेण्याचे बंधन बँकेला राहिलेले नाही. त्यामुळे बँकेने धोरणात्मक निर्णय घेवून **"भाग भांडवल वाढविण्यापेक्षा गंगाजळी वाढविण्यावर"** भर दिलेला आहे. तसेच सन २०२२ चे तुलनेमध्ये सन २०२३ अखेरील भाग भांडवल रु.३७.८१ लाख एवढया रकमेने कमी दिसत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे अहवाल वर्षात यापुर्वीच्या टेक ओव्हर झालेल्या कर्जदारांचे राजीनामे बँकेने मंजूर केलेले आहेत. ही कर्जे व्याजदराच्या स्पर्धेसाठी खाजगी अथवा राष्ट्रीयकृत बँकांमध्ये वर्ग झालेली होती. तसेच या वर्षात नियमितपणे परतफेड होऊन कर्जे बंद झाल्यामुळे देखील संबंधित सभासदांनी राजीनामे दिलेले आहेत. भाग भांडवलाची मुव्हमेंट पाहिली तर एकूण नवीन सभासदत्वापोटी अहवाल वर्षामध्ये रु.१४.०६ कोटी एवढी रक्कम बँकेला प्राप्त झालेली असून सभासद राजीनाम्यापोटी रु.१४.४५ कोटी एवढी रक्कम बँकेने संबंधित सभासदांना अदा केलेली आहे. अहवाल वर्षामध्ये ४६११ सभासदांनी राजीनामा दिलेला असून ४८६५ नवीन सभासद झालेले आहेत. सभासद संख्येमध्ये २५४ एवढी वाढ झालेली आहे.

श्री वाणी यांचे कर्जवाढी संदर्भातील निरीक्षणाला उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, अहवाल वर्षामध्ये सुमारे रु.५०० कोटी रकमेची कर्जे ही मूदतपुर्व बंद झाली. तरी देखील बँकेने कर्जामधील निव्वळ वाढ ही रु.३४१ कोटी रुपये एवढी केली आहे. ही वाढ ७.२१ टक्के एवढी आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये ठेव व कर्जामध्ये चांगली वाढ करणे हे प्रत्येक सेवकाचे प्रथम ध्येय राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया डायव्हर्जन्स संदर्भातील त्यांचे प्रश्नाला उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की मागील वर्षामध्ये रेकॉर्ड ऑफ रिकव्हरी विचारात घेऊन वैधानिक लेखा परिक्षकांचे सविस्तर तपासणीनंतर व तपशीलवार चर्चेनंतर बँकेने ४ कर्जखाती एनपीए दर्शविली नव्हती. बँकेची ही कृती ही वैधानिक लेखा परिक्षक यांनी देखील प्रमाणित केली. मात्र रिझर्व्ह बँकेच्या तपासणीमध्ये बँक, वैधानिक लेखा परिक्षक आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यामध्ये मतभिन्नता आली. सबब रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तपासणीनुसार बँकेने कार्यवाही सुरु केली असता संबंधित कर्जदार यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये कैफियत दाखल करुन खाती एन.पी.ए. करण्याबद्दल बँकेवर मनाई हुकूम बजावला. त्यामुळे बँकेने उच्च न्यायालयाचे आदेशानुसार ही खाती एनपीए म्हणून दाखविली नाहीत. बँकेने केलेल्या या कार्यवाहीस अनुमती देण्याची विनंती बँकेने रिझर्व्ह बँकेला केली आहे. याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशांनुसार बँकेने ७४ व्या वार्षिक अहवालामध्ये पान क्र.६६ वर सविस्तर तपशील नमुद

केलेला आहे. याचाविचार केला असता बँकेने कुठलीही चूकीची माहिती नमूद केलेली नाही हे स्पष्ट होते असे सांगितले.

५. श्री अशोक समुद्र यांनी बँकेने केलेल्या कामगिरीबद्दल केलेल्या कौतुकपूर्ण उल्लेखाची नोंद घेवून त्यांचे आभार श्री कश्यप यांनी व्यक्त केले व पुढच्या वर्षी अधिक जास्त पध्दतीने व्यवसाय कसा करता येईल याचा प्रयत्न करु असे सांगितले. तसेच श्री लक्ष्मण पवार यांनी सभेमध्ये विविष विषयांवर चांगल्या प्रकारे विश्लेषण झाल्याचे मत व्यक्त केले. त्याबद्दल श्री कश्यप यांनी त्यांचेप्रती आभार व्यक्त करुन त्यांना धन्यवाद दिले. श्री भास्कर चिल्लाळ यांनी सर्व संचालक हे निरलसपणे काम करत असल्याचे मत व्यक्त केले. श्री कश्यप यांनी त्यांचेप्रती आभार व्यक्त करुन त्यांना धन्यवाद दिले. श्री राजीव हिरवे यांनी देखील बँकेने आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामगिरीबाबत समाधानी असल्याचे मत व्यक्त केले होते. श्री कश्यप यांनी त्यांचे प्रती आभार व्यक्त करुन त्यांना धन्यवाद दिले. त्याचप्रमाणे श्री चिल्लाळ व श्री हिरवे यांनी अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एखादी योजना बँकेने जाहीर करावी अशी सूचना केलेली होती. त्यांच्या या सूचनेचा बँक नक्की विचार करेल असे श्री कश्यप यांनी सांगितले.

६. सौ द्वारका मांदळे यांनी अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सभासंदाचे शाखानिहाय छोटे मेळावे व्हावेत तसेच बँकेसाठी स्वतंत्र जनसंपर्क अधिकारी असावा असे मत व्यक्त केले होते. त्यांच्या दोन्ही सूचनांचा बँक जरुर विचार करेल असे श्री कश्यप यांनी त्यास उत्तर देताना सांगितले.

७. श्री नारायण थेटे यांनी व्यक्त केलेल्या सेवेसंदर्भातील सूचनेला उत्तर देताना श्री कश्यप यांनी श्री थेटे यांचे मताची नोंद घेतली आहे. संबंधित सेवकाकडून देखील माहिती मागविली आहे. त्यावरुन सदर विषय हा वैयक्तिक स्वरुपाचा असल्यामुळे त्याबद्दल सभेमध्ये चर्चा न करता स्वतंत्रपणे समक्ष भेटून चर्चा करावी असे सांगितले.

८. श्रीमती फडके यांनी ज्येष्ठ नागरिक यांना उपलब्ध असलेल्या सुविधां बाबत माहिती विचारली होती. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, बँकेच्या विविध सेवा ज्येष्ठ नागरिक यांना त्यांचे विनंतीनुसार व आवश्यकतेनुसार विनाशुल्क व घरपोहोच उपलब्ध आहेत. या सेवा घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी जवळच्या शाखांमध्ये आवर्जुन संपर्क करावा असे आवाहन श्री कश्यप यांनी केले.

९. श्री मिलींद भिडे यांनी ताळेबंदामध्ये दाखविलेल्या ब्रँच ॲडजेस्टमेंट यासंबंधी माहिती दयावी अशी सूचना केली होती. तसेच काही वेळा ही रक्कम ॲसेटमध्ये तर काही वेळेला ती लायबिलिटी अंतर्गत नमूद करण्यात येते असे मत त्यांनी व्यक्त केले होते. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की , कोणत्याही शाखांमधून एखादया शाखेमधील खात्यां संबंधी केले जाणारे व्यवहार तसेच मुख्यकचेरी व शाखा या अंतर्गत होणारे व्यवहार याचा समावेश ब्रँच ॲडजेस्टमेंट यामध्ये होत असतो. जेव्हा एखादया शाखेच्या ठेवी हया कर्जांपेक्षा जास्त असतात तेव्हा ही रक्कम शाखेच्या ॲसेट साईडला दर्शविली जाते व मुख्यकचेरीच्या लायबिलिटी साईडला असते. जेव्हा एखादया शाखेची

कर्जे ही ठेवींपेक्षा जास्त असतात तेव्हा ही रक्कम शाखेच्या लायॅबिलिटी साईडला तर मुख्यकचेरीच्या ॲसेट साईडला असते. प्रत्येक आर्थिक वर्षाचे अखेरीस हया रकमांचे नेटिंग होऊन ताळेबंदामध्ये त्यानुसार रक्कम दर्शविली जाते.

१०. श्री हेमंत नागपूरकर यांनी अटल पेन्शन योजनेअंतर्गत बँकेने केलेल्या कामगिरीचे कौतुक केले होते. श्री कश्यप यांनी त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले.

११. ॲड तुपे यांनी बँकेला पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनदंन केले आहे. त्याबद्दल त्यांना श्री कश्यप यांनी धन्यवाद दिले.

१२. श्री रमेश सप्रे यांनी पासबूक प्रिंटर संदर्भात केलेल्या सूचनेची नोंद घेतली असून त्यावर त्वरित कार्यवाही पुर्ण करत आहोत असे श्री कश्यप यांनी सांगितले.

१३. श्री भिडे यांनी अहवाल छपाईमध्ये खर्चात कपात करण्यासंबंधी सूचना केली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशांनुसार वार्षिक अहवालामध्ये जास्तीत जास्त माहिती व प्रगटने सभासदांचे अवलोकनार्थ दिलेली असतात. त्यामुळे वार्षिक अहवालामधील पृष्ठसंख्या कमी करता येणे शक्य नसून त्यावरील खर्चामध्ये कपात संभवनीय वाटत नाही असे नमूद केले.

१४. श्री सातपुते यांनी छोटया कर्ज वाढीसाठी बँकेने केलेल्या प्रयत्नांची माहिती विचारली होती. पुणे व मुंबई येथे छोटया कर्ज प्रकरणांवर त्वरित निर्णय होण्यासाठी स्वतंत्र रिटेल बँकिंग सेल स्थापन केले असून सहायक महाव्यवस्थापक दर्जाचे अधिकारी तेथे नियुक्त केलेले आहेत. तसेच अहवाल वर्षामध्ये विविध अभियाने अंमलात आणून बँकेने प्रयत्नपुर्वक छोटया कर्जांमध्ये वाढ केली आहे. या आर्थिक वर्षामध्ये देखील रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशांनुसार छोटया कर्जामध्ये वाढ होण्यासाठी बँक विविध योजना राबवून प्रयत्न करत आहे असे सांगितले.

१५. श्री जगदीश कदम यांनी अमृत महोत्सवाचे पार्श्वभूमीवर केलेल्या सूचनांची नोंद घेतली असून त्याप्रमाणे योजना नियोजित करत असल्याचे श्री कश्यप यांनी सांगितले. तसेच अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सर्व सभासदांकडून बँकेला सहकार्य अपेक्षित असून त्याचे स्वागत आहे. या संदर्भात काम करु इच्छिणा-या सभासदांनी त्यांची नावे ही जवळच्या शाखेमध्ये जरुर दयावीत असे आवाहन केले.

१६. श्री हरेराम सोवनी यांनी उच्चशिक्षित व्यक्तींचा सल्ला बँकेने घ्यावा अशी सूचना केली होती. बँक उच्चशिक्षित व्यक्तींचा सल्ला नेहमीच घेत असते. यामध्ये सनदी लेखापाल, केंद्रिय निबंधक, अनुभवी व ज्येष्ठ सभासद, विधान सल्लागार, व्हॅल्यूअर्स, रिझर्व्ह बँकेतील अधिकारी यांचा समावेश आहे अशी माहिती दिली.

१७. श्री पंचमुखी यांनी चालू आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावित शाखाविस्ताराची माहिती विचारली होती. बँकेच्या आजमितीस ७१ शाखा आहेत. चालू आर्थिक वर्षामध्ये नवीन शाखा उघडणे प्रस्तावित नाही. सध्या असलेल्या शाखांमधून प्रयत्नपुर्वक व्यवसाय वाढीचे धोरण संचालक मंडळाने स्वीकारले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे असे सांगितले.

१८. कार्बन क्रेडिटवर कर्ज देण्यासंबंधी अधिक माहिती देण्याची श्री मराठे यांनी केलेली सूचना ही निश्चीतच् स्वागतार्ह आहे. त्यांचेकडून यासंदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी बँकेच्या कर्ज विभागातील अधिकारी यांना सूचना देत आहोत असे सांगितले.

१९. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण करण्याची सूचना श्री मानकर यांनी केलेली होती. त्यांची सूचना निश्चीतच चांगली आहे. त्यांचे सूचनेची नोंद घेतली असून त्यावर उचित कार्यवाही करु असे श्री कश्यप यांनी सांगितले.

२०. गुजराथ राज्यामध्ये शाखा विस्तार करण्याची सूचना एका सभासदाने केलेली होती. बँकेची गुजराथ राज्यामध्ये सध्या एकच शाखा आहे. गुजराथ राज्यामध्ये अथवा अन्य राज्यांमध्ये चालू आर्थिक वर्षामध्ये शाखा विस्तार करण्याचा बँकेचा सध्या मानस नाही हे स्पष्ट केले.

२१. श्री चंद्रचूड यांनी शाखास्तरावर सभासदांचे छोटे मेळावे घ्यावेत अशी सूचना केली होती. त्यांचे सूचनेची नोंद घेतली असून अमृत महोत्सवी वर्षामध्ये यासंदर्भात निश्चीतच कार्यवाही होईल. या मेळाव्यांसाठी सभासदांना SMS, Website, Email इत्यादि माध्यमाद्वारे त्याचे निमंत्रण पाठविले जाईल. त्यामध्ये सभासदांनी अवश्य सहभागी व्हावे असे आवाहन केले.

२२. श्री मुर्ती यांनी वार्षिक अहवालामध्ये सक्सेस स्टोरीज व अँचीव्हमेंटस याचा स्वतंत्रपणे उल्लेख करावा अशी सूचना केली. त्यांचे सूचनेची नोंद घेतली असून त्यावर उचित कार्यवाही करत आहोत असे श्री कश्यप यांनी सांगितले.

२३. श्री भालेराव यांनी बँक नक्की प्रगती करत आहे परंतू त्याची गती कमी असू शकते असे सांगितले होते. अहवाल वर्षामध्ये बँकेने केलेल्या वाटचालीचा आढावा घेतला असता पुढील आगामी कालावधीमध्ये बँकेच्या प्रगतीला नक्की गती येईल असा विश्वास वाटतो. बँकेने यावर्षी मार्केटिंग विभागात सेवकांची स्वतंत्र टीम तयार केली असून त्याचे नेतृत्व हे उप महाव्यवस्थापक दर्जाचे अधिकारी करत आहेत. या टीमद्वारे कर्ज, ठेव व अन्य व्यवसाय यामध्ये बँक चांगली वाढ निश्चीत करेल असा विश्वास व्यक्त केला.

श्री भालेराव यांनी जुने सेवक निवृत्त होत असून त्याआधारे सेवक भरती करण्याची सूचना केली होती. श्री भालेराव यांनी त्यासंबंधी केलेली सूचना ही निश्चीत स्वागतार्ह आहे. त्यावर नक्की विचार करुन कार्यवाही करत आहोत असे श्री कश्यप यांनी सांगितले.

२४. श्री माने यांनी अमृत महोत्सवी कालावधीत शाखानिहाय मेळावे घ्यावेत तसेच बँकेमध्ये जनसंपर्क अधिकारी असावा अशी सूचना केली आहे. त्यांचे सूचनेची देखील नोंद घेतली असून त्यावर उचित कार्यवाही करत आहोत असे श्री कश्यप यांनी सांगितले.

२५. काही सभासदांनी बँकेचा सीडी रेशो हा कमी असल्याचे मत व्यक्त केले. यासंदर्भात कर्ज व्यवसाय संबंधीचा तपशील विशद करताना त्यांचे विस्तृत उत्तर दिलेले आहे असे श्री कश्यप यांनी स्पष्ट केले.

२६. काही सभासदांनी सभेत तसेच विविध माध्यमातनू व पत्राद्वारे बँकेकडे पुढीलप्रमाणे काही माहिती विचारली होती.

२६.१ – सन २०२१-२२ साली निरस्त कर्जे वसूलीचे लक्ष रु.४९.४१ कोटी एवढे होते. प्रत्यक्ष वसूली रु.४.९९ कोटी झाली. या वर्षी निरस्त कर्जे वसूलीचे लक्ष रु.२१ कोटी ठेवले होते. प्रत्यक्षत मात्र रु.४.६७ कोटी वसूली झाली. सन २००६ ते २०२२ या काळात निर्लेखित २७५८ खात्यांचे रु.५१८ कोटी रुपये निरस्त केले आहेत. त्यापैकी ५८७ खात्यांवर फक्त रु.८० कोटी रुपये वसूली झाली आहे. याचाच अर्थ सन २०२२ पर्यंत २१७१ निरस्त खात्यांची रक्कम वसूल करता आली नाही. ही रक्कम रु.४३७ कोटींपेक्षा अधिक आहे. या वर्षी तो फरक अधिकच वाढलेला दिसतो.

यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की सन २०२१-२२ साली रु.४९.४१ कोटी एवढे उद्दिष्ट ठेवण्यापाठीमागे हेतू असा होता की, त्याच वर्षी बँकेने निरस्त कर्जांचे वसूलीसाठी स्वतंत्र विभाग निर्माण करुन स्वतंत्र मनुष्यबळाचे नियोजन केलेले होते. उद्दिष्ट ठेवले की प्रयत्नांची पराकाष्टा केली जाते. उद्दिष्ट नसले तर प्रयत्नांना गती मिळत नाही. प्रत्यक्षात वसूली मात्र खूपच कमी म्हणजे १० टक्के एवढीच झाली ही वस्तुस्थिती आहे. तसेच कर्ज राईट ऑफ का करावे लागते या संदर्भातील कारणमिमांसा नमूद करताना श्री कश्यप यांनी पुढील माहिती दिली.

कर्जे राईट ऑफ करणे ही एक प्रकारे Accepted Business Risk आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

वैयक्तिक जीवनात अथवा व्यवसाय करताना काही जोखमी या येत असतात व त्या १००% कधीही टाळता येत नाहीत.

अनेक वेळा कर्जदाराच्या धंद्यात मोठी खोट येते, जसे की उधारी बुडते, कर्जदाराची फसवणूक होते, सरकारी धोरणात बदल झाल्याने उत्पादित मालाची मागणी नाहीशी होते – उदा प्लास्टिक, चायनीज माल ईत्यादी, नैसर्गिक आपत्ती मुळे व्यवसाय उभा राहू शकत नाही उदा महापूर, भूकंप, कोरोना सारखी महामारी ईत्यादी देखील व्यवसाय बुडण्यास कारणीभूत ठरते व कर्ज वसुलीसाठी मर्यादा पडतात.

अनेक वेळा कर्जदार आजारी पडतात, अपघात होतो त्यात प्रचंड खर्च होतो, व्यवसाय बंद पडतो, उत्पन्न बंद पडते मात्र खर्च व कर्जावरील व्याज वाढत जाते आणि कर्ज रक्कम व परतफेड व तारणाच्या प्रमाणात प्रचंड प्रमाणात व्यस्तता येते.

अनेक वेळा कर्जदार हाच मुळात फ्रॉड स्वभावाचा असतो तो बँकेला फसवतो. काही वेळा बँकेचे कर्मचारी हे फ्रॉड असतात ते बँकेमध्ये असणाऱ्या पोझिशनचा गैरफायदा घेऊन चुकीचे कर्ज वाटप करणे, संगनमत करणे या बाबी करतात

या सर्व बाबीसाठी बँकेला १००% तरतूद करावीच लागते अशा सर्व प्रकारच्या कर्जावर वसुलीसाठी उपलब्ध असलेले सर्व पर्याय वापरून झाल्यानंतरच कर्ज खाते निरस्त करण्यासाठी घेतले जाते, या केस मध्ये कर्जास असलेले तारण विकलेले असते, सदर तारणाची किंमत ही घसरलेली असते, तारण मशिनरी अथवा वाहनाची किंमत जसजसा कालावधी पुढे जाईल तसतशी ती कमी कमी होत जाते मात्र कर्जाची नावेबाकी ही सतत वाढत जाते, स्थावर तारणाचा लिलाव काढलेला असल्याने लिलावात मिळकत विकत घेणाऱ्या इच्छुकांची संख्या खूप कमी असते व त्याची किंमत देखील खूप कमी होते आणि याची उलट बाजू म्हणजे कर्जावरील व्याजाची रक्कम ही अव्याहतपणे वाढत जाते सबब उपलब्ध तारण आणि प्रत्यक्ष येणे बाकी  या मध्ये मोठी तफावत निर्माण होते आणि राईट ऑफ करण्यासाठीची  रक्कम वाढत जाते. कर्जे राईट ऑफ केल्याने बँकेच्या ताळेबंदाची स्वच्छता होते. बँकेचे रेशो रिझर्व्ह बँकेच्या निकषांप्रत येतात, बँकेच्या ठेवीदाराचे यात नुकसान होते ही एक बाजू जशी आहे तशी कर्जे राईट ऑफ केल्याने बँकेच्या व्यवसायात वाढ होऊन बँकेच्या ठेवीदारांचे दूरदृष्टीने पाहिल्यास हित संवर्धनच होते असे म्हणता येईल.

बँक जुन्या कामकाजामध्ये फारशी अडकून न पडता नवीन व्यवसाय शोधून त्यातून प्रगती करू शकते, ज्यामुळे बँकेचे सेवक, सभासद या सर्वांचाच विश्वास व उत्साह वाढतो.

रिटर्न ऑफ केलेल्या कर्जात मोठी वसुली होणे ही जवळपास अशक्य बाब असते व मोठी रक्कम ही सोडून द्यावी लागते. तरी देखील बँकेचा वसुली चा हक्क अबाधित ठेवल्याने भविष्यात त्या कर्जदाराने अथवा त्याच्या वारसांनी पुन्हा काही ॲसेट निर्माण केल्यास त्यावर बँकेचा आपोआप बोजा येतो व वसुलीसाठी मार्ग उपलब्ध होतो. आपल्या बँकेच्या बाबत २००६ मधील अशा काही वसुली या मागील वर्षी झालेल्या आहेत. आपल्या वैयक्तिक जीवनात देखील आपल्याला असे अनुभव येतात, आपले मित्र नातेवाईक अनेक वेळा आपली उधारी देत नाहीत, आजारी पडतात, मृत्यू होतो, किंवा आपली देखील काही आर्थिक व्यवहारात फसवणूक होते  अशा वेळी  ठराविक कालावधीनंतर आपण देखील अशी रक्कम सोडून देतो.

२५.२ - सन २०२१-२०२२ साठी निरस्त ख्यातातील वसुलीचे उद्दीष्ट रु २१.०० कोटी ठेवले होते, प्रत्यक्षात मात्र रु ४.६७ कोटी वसुली झाली याबाबत उत्तर देताना श्री कश्यप यांनी पुढील माहिती दिली. सन २०२१ -२०२२ साली रु २१ कोटी उद्दीष्ट ठेवताना काही कर्जदाराच्या मालमत्ताचा शोध घेऊन त्या विक्री करून पैसे वसुलीची शक्यता वाटत होती, एक कर्जदाराने त्या पोटी काही रक्कम भरली देखील परंतु दुर्दैवाने त्या कर्जदाराचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला आणि वसुली प्रक्रिया पुन्हा बॅक टू स्क्वेअर वन पाशी येऊन थांबली, आता वारसांचे नाव लावण्याची प्रक्रिया सुरु केलेली असून या वर्षी त्यातून वसुली होऊन मोठी वसुली म्हणजे रु ७ ते ८ कोटी पर्यंत होईल असे वाटते.

दुसऱ्या एका कर्ज प्रकरणी बोजा असलेली अशीच मालमत्ता विकण्यासाठी बँकेने ग्राहक मिळवला होता, परंतू काही कारणांनी सदर ग्राहकाने ऐनवेळी माघार घेतली आणि मालमत्ता विकत घेण्यास नकार दर्शवला आणि मोठी अपेक्षित वसुली रु ७ कोटी पर्यंत होणारी होऊ शकली नाही. या वर्षी पुन्हा बँकेने नवीन ग्राहक मिळवून प्रयत्न केले असून तो व्यवहार होईल अशी खात्री वाटते.

अन्य काही कर्जाबाबत वसुली साठी मिळकती शोधून त्यावर बोजा चढवून वसुलीचे प्रयत्न सुरु आहेत परंतू सदर काम हे अतिशय क्लिष्ट व वेळखाऊ पणाचे असल्याने त्यात प्रयत्नांचे सातत्य ठेवावे लागते आणि अशा वेळी समोर उद्दीष्ट नसेल तर हळूहळू प्रयत्न देखील कमी होत जातात, सबब राईट ऑफ चे उद्दीष्ट व प्रत्यक्ष यात मोठी तफावत दिसून येते.

राईट ऑफची रक्कम वाढत जात आहे हे बरोबर आहे, जसे थकीत कर्जाचे वय वाढत जाते तसे रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार त्यावर चढत्या क्रमाने तरतूद करावी लागते, कर्ज रकमेच्या १००% तरतूद झाल्याने ती कर्जे बँकेच्या पुस्तकातून काढून टाकणे बँकेच्या दृष्टीने हितावह ठरते.

सर्व सामान्य पणे ५% कर्जे ही एनपीए होतात आणि सर्व बँका मधून राईट ऑफ ही प्रक्रिया अवलंबली जाते.

या मध्ये कर्जे राईट ऑफ करताना आवश्यक ती प्रकिया जसे की स्टाफ अकौंटेबिलीटी, प्रकरणाची सखोल चौकशी बद्दल ची देखील पद्धती विकसित केली आहे.

८ जून २०२३ रोजी रिझर्व्ह बँकेने देखील या बाबत कर्जे राईट ऑफ करताना बँकेच्या बोर्डाने समयोचित व विस्तृत धोरण तयार करून राईट ऑफ व ओटीएस करण्यास सर्वच बँकांना अनुमती दिली आहे

२५.३ – निरस्त कर्जाचे ठराव वार्षिक सभेच्या पटलावर दिसत नाही असा एक मुद्दा होता. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की या वर्षी बँकेने एकही कर्ज निरस्त केलेले नाही. अहवाल पान क्र १० वर हे स्पष्ट केलेले आहे.

२५.४ – अंदाजपत्रकाचा विषय हा विषय पत्रिकेमध्ये आहे मात्र गतवर्षी प्रमाणे याही वर्षी अंदाजपत्रक आश्वासन देऊनही छापले नाही असा आणखी एक मुद्दा होता. या संदर्भात श्री कश्यप यांनी सांगितले की वार्षिक अहवालामध्ये पान क्रमांक ७८ वर तसेच सभासदांना वितरित करण्यात आलेल्या रंगीत छापील पुस्तिकेमध्ये पान क्रमांक १७ वर सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाजपत्रक छापलेले आहे.

२५.५ – अहवाल पान ८ वर बँकेचे भाग भांडवल मध्ये रु ४४.७४ कोटीची वाढ आहे त्यामध्ये रीव्हल्यूएशन रिझर्व्ह मुळे वाढ झाल्याचे दिसते, प्रत्यक्षात रिझर्व्ह हा फक्त रु ९० लाखाचा आहे यात काही चूक आहे का? असे संबंधित सभासदाने विचारले होते. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेच्या पूर्वीच्या परिपत्रकाप्रमाणे रीव्हॅल्युएशन रिझर्व्ह हा टायर २ कॅपिटल मध्ये नमूद केला जात असे, दिनांक ३१/०३/२०२३ रोजी रिझर्व्ह बँकेने परिपत्रक काढून सदर रिझर्व्ह हा टायर १ कॅपिटल मध्ये घेण्यास परवानगी दिली, प्रत्यक्ष रीव्हॅल्युएशन रिझर्व्ह हा नियमानुसार दरवर्षी अमोरटाईज केल्याने मागील वर्षी पेक्षा रु ३.२६ कोटींनी कमी झालेला आहे व बँकेच्या टायर वन कॅपिटल मध्ये रु ४४.७४ कोटीची वाढ दिसून येते या बाबत टायर १ कॅपिटल नेमके कसे व कोठे वाढले याचा ब्रेकअप आपणांस देता येईल. वानगी दाखल सांगायचे असल्यास वर्षभर गोळा केलेली नाममात्र सभासद फी, भाग धारकांची अडमिशन रक्कम इत्यादी स्वरूपाच्या विविध रकमा या बँकेच्या टायर १ कॅपिटल मध्ये समाविष्ट होत असतात. मूळ सभासद भाग भांडवलात मात्र मागील वर्षीचे तुलनेने रु ३७.८२ लक्ष ने कमी झाले आहे. मोठ्या रकमेच्या सभासदांचे सुमारे १४.५० कोटीचे राजीनामे झाले, काही मयत झाले. सभासदांच्या संख्येत गतवर्षीच्या तुलनेत वाढ असून रु १४.१५ कोटींचे नवीन सभासद झाले आहेत.

२५.६ – ताळेबंदामध्ये पान क्रमांक ४ व ५ या ठिकाणी अनुक्रमे ठेवी रु.१७७ कोटी व कर्जे रु.२३३ कोटी म्हणजे एकूण रु.४१० कोटींची वाढ झालेली आहे. आपल्याला रु.२३३ कोटींचे कर्ज का घ्यावे लागले व त्याची गुंतवणूक नेमकी कोणत्या प्रकारे केली असा प्रश्न विचारला होता. तसेच कर्जावर दिलेले व्याज व गुंतवणूकीवर मिळालेला व्याज यामध्ये नफा राहतो का असेही त्यांनी विचारले होते. अन्य बँका ठेवी घेत आहेत म्हणून आपणही घेत आहोत असे आहे का असेही त्यांनी विचारले होते. सीडी रेशो हा खूप कमी असताना बँक ठेवी का स्वीकारत आहे आणि बँकेकडे इतकी लिक्विडीटी असताना पुन्हा बँकेने रु २३३ कोटींचे बोरोविंग का करत आहे, यातून

काय फायदा होतो, ठेवी व कर्जे वाढवण्यापेक्षा नफा किती वाढला हे पाहणे आवश्यक आहे. असा एक मुद्दा होता.

त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी पुढील माहिती दिली. बँकेने मागील वर्षी ३ वेळा ठेवींचे व्याजदर कमी केले. एकूण बाजारातील परिस्थिती पाहिली तर अनेक मोठ्या व नामवंत बँका या ठेवींसाठी ८% वा त्यापेक्षा अधिक व्याजदर देत होत्या अशा वेळी जनता बँकेने मात्र ठेवी वरील व्याजदरात वाढ करण्याऐवजी व्याजदर कमी करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. बल्क ठेवीना जादा व्याजदर देऊन ठेवी स्वीकारण्याबाबत उदासीन धोरण स्वीकारून त्यांना बँकेच्या लागू व्याजदरानुसार व्याज देण्याचा निर्णय केला. असे असले तरी समाजामध्ये बँकेची असलेली प्रतिमा, बँकेकडून ग्राहकांना देत असलेली तत्पर सेवा या मुळे बँकेने ठेवीचे व्याजदर कमी केलेले असतानाही बँकेने ठेवी मध्ये वाढ दर्शवली आहे. बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट नुसार बँकेच्या अटींवर ग्राहक बँकेत ठेवी ठेवत असल्यास बँकेस ठेवी स्वीकारणे अनिवार्य असते. सीडी रेशो वाढवणे आवश्यक आहे तो ६५% पर्यंत असावा. हा उपस्थीत केलेला मुद्दा योग्य असून त्या दृष्टीने बँकेने निश्चित प्रयत्न सुरु केले आहेत सन २०२१-२०२२ साली बँकेचा सीडी रेशो ५३.१३% होता तो सन २०२२-२०२३ साली २.७३% ने वाढून ५५.८६% इतका झालेला आहे. बँकिंग व्यवसाय हा अतिशय जोखमीचा झालेला असून कर्ज देताना आवश्यक ती काळजी घेणे क्रमप्राप्त आहे. बाजारात कर्ज वाटपाची प्रचंड स्पर्धा निर्माण झालेली आहे विविध प्रकारच्या खाजगी, स्मॉल फायनान्स बँकाची स्पर्धा आहे.पतसंस्था, NBFC, फिन्टेक कंपन्या, या देखील रिटेल लोन मध्ये उतरल्या आहेत. त्यांना कर्ज वाटपाची फारशी बंधने नसतात व ते स्वैरपणे कर्ज वाटप करत असतात,अशा वेळी उतावीळपणे चुकीचे कर्ज वाटप होऊ नये याची दक्षता घेतली पाहिजे सबब, कर्जवाढीचा सुयोग्य वेग राखणे योग्य असते. कर्जवाढीसाठी रिझर्व्ह बँकेची देखील अनेक बंधने असून त्या सर्व बंधनांचे पालन देखील करणे अनिवार्य आहे व त्याच बरोबर जोखीम व्यवस्थापन करून वाटचाल करताना सीडी रेशो हा हळू हळू पण Increasing Direction ने वर गेलेला योग्य असतो. घेतलेल्या डीपॉझीट ची बँकेने उपलब्ध असलेल्या सर्व मार्गांचा अवलंब करून सुरक्षित अशा स्वरूपाची गुंतवणूक केलेली आहे.

२५.७ – इतर येणी मध्ये आयकर व इतर अन्य येणी दिसत आहेत ही रक्कम परत येण्यासाठी आपण काही प्रयत्न करतो का? याची माहिती विचारली होती. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, आयकर खात्याने बँकेला मिळालेल्या काही उत्पन्नाचा भाग की जो आयकर पात्र नाही त्यावर आयकर आकारणी करून बँकेकडून जास्त आयकर घेतला आहे. या बद्दल बँकेने इन्कमटॅक्स ट्रायब्युनल कडे अपील केले होते व त्या केसे मध्ये बँकेच्या बाजूने निकाल लागलेले असून आयकर खात्याकडून ही रक्कम येणे अपेक्षित आहे, त्या

रकमेवरील व्याज सुमारे २.२० कोटी हे आयकर खात्याने बँकेकडील हिशोबात वळते करून घेतले आहे व आयकराकडून येणे असलेली रक्कम पुढील हिशोबातून वळती करून घेऊन हा विषय पुढील काही वर्षामध्ये संपेल अशी आशा वाटते.

२५.८ - संचालक मंडळ खर्चात वाढ का झाली असा प्रश्न विचारला होता. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की , सन २०२३ साली रु ४०.४७ लक्ष तर सन २०२२ साली रु ११.८० लक्ष एवढा खर्च झाला. म्हणजेच रु २८.६७ लक्ष जास्त खर्च झाला. या वाढीव खर्चामध्ये मुख्यत्वे निवडणूक खर्च रु २३ लक्ष समाविष्ट आहे. सन २०२२-२०२३ मध्ये संचालक मंडळ निवडणूकीच्या अनुषंगाने विशेष सर्वसाधारण सभा घेणे, नोटीसेस पाठवणे (रु १७५००० सभासद * रु १० रु नोटीस खर्च = रु १७.५० लक्ष, वर्तमान पत्र नोटीस खर्च, सभासद यादी छपाई खर्च) ईत्यादी मुळे या खर्चात वाढ दिसते. तसेच रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार एनपीए रिव्ह्यू कमिटी, आय टी कमिटी ईत्यादी कमिटी नव्याने स्थापन केल्या गेल्या आणि संचालक मंडळ सभा ह्या मागील वर्षी २२ चे तुलनेत या वर्षी २५ सभा झाल्या, सबब या खर्चामध्ये वाढ झालेली दिसते.

२५.९ – प्रोव्हिजन फॉर नॉन बँकिंग ॲसेट याची रु ४१.२८ कोटी तरतूद कशासाठी केली आहे याबाबत विचारणा केलेली होती. यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, बँकेने एका १३ कोटीच्या कर्ज प्रकरणी एनपीए असलेल्या खात्यास सन २०१२ साली राईट ऑफ केले, सन २०२१ साली सदर राईट ऑफ खात्यास तारण असलेली मालमत्ता ७ वेळा लिलाव काढून विकली जात नसल्याने बी आर ॲक्ट सेक्शन ९ नुसार ही तारण मालमत्ता बँकेने स्वतःच स्वतःला विकली आणि आपल्या नावावर करून घेतली. त्या समोर आलेली रु ३७.५० कोटीची रक्कम बँकेने २०२१ साली नफ्यामध्ये दाखवली अशा प्रकारे प्रत्यक्ष जागा विक्रीची रक्कम ही नफ्यास न दाखवता तिची प्रोव्हिजन केली पाहिजे असे आरबीआय ने निर्देशित केले सदर जागा बँकेने ११ मे २०२३ रोजी रु ४५ कोटींना प्रत्यक्ष विकून टाकली. मात्र सदर व्यवहार हा ३१/०३/२०२३ पूर्वी न झाल्याने ताळेबंदात ती प्रोव्हिजन म्हणून दाखवली आहे, पुढील वर्षी ती नफ्यात दाखवता येईल.

२५.१० – गुंतवणुकीवरील नफा मागीलवर्षी रु २८ कोटी होता तो या वर्षी केवळ १.५४ कोटीच दिसतो. त्याची कारणे विचारली होती. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, गुंतवणुकीचा नफा हा सर्वस्वी बाजारातील व्याजदर परिस्थिती वर अवलंबून असतो. जेव्हा बाजारातील व्याजदर कमी होतात तेव्हा गव्हर्नमेंट सिक्युरिटीचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढतात रु १०० दर्शनी मूल्य असलेली सिक्युरिटी ही रु १०२, १०३ पर्यत विकली जाते अशा गुंतवणुकीच्या विक्रीतून नफा होत असतो. कोरोना काळात व्याजदर खुपच

कमी झाले होते अगदी ३.५०% पर्यंत खाली आले होते तेव्हा गव्हर्नमेंट सिक्युरिटीचे भाव वाढले होते व त्यावेळी नफा झाला होता, आता बाजारातील व्याजदर वाढत असल्याने गव्हर्नमेंट सिक्युरिटीचे भाव कमी होत चालले आहेत सबब, बँकेने या वर्षी हा व्यवसाय केलेला नाही.

२५.११ – जादा तरतुदी परत ची बेरीज रु ५३.८० कोटी होते याचा अर्थ रु ५ कोटीचा जो नफा आहे तो नफा रु.५४ कोटी उत्पन्नाची बाजू धरल्याने दिसतो म्हणजे वस्तुस्थितीत रु ४९ कोटी तोटाच आहे असा मुद्दा विचारला होता. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, अकौटींग स्टँडर्ड नुसार कोणत्याही तरतुदी जर परत करावयाच्या असतील तर त्या नफातोटा खातीच घेऊन जमाखर्च करावा लागतो. बँकेने या वर्षी रु १९६ कोटीच्या तरतुदी नावे/खर्ची टाकलेल्या आहेत आणि ५४ कोटीच्या तरतुदी पुन्हा जमा घेतल्या आहेत म्हणजे एकुणात १४२ कोटीच्या तरतुदी बँकेने नफातोटा खाती नावे टाकून केलेल्या आहेत. बँकेस या वर्षी एकूण १४५ कोटी ऑपरेटिंग प्रॉफीट झालेला असून त्यातून तरतुदी करून रु ८ कोटीचा नफा हा दाखवलेला आहे. बँकेस तोटा नाही.

२७. मागील ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये काही सभासदांनी माहिती मागितली होती. ही माहिती श्री कश्यप यांनी त्या वेळेस सांगितली होती. त्यासंदर्भात ATR स्वरुपात त्याची थोडक्यात पुढीप्रमाणे माहिती श्री कश्यप यांनी सभेमध्ये दिली.

२६.१ मागील सभेमध्ये बँकेच्या लिगल टीमबाबतचा तपशील विचारला होता. त्याबाबत माहिती देताना श्री कश्यप यांनी बँकेच्या लिगल टीममध्ये पुणे व मुंबई येथे कार्यरत एकूण २९ सेवक आहेत. तसेच या टीममध्ये ५ सेवक कायदयाची पदवी प्राप्त केलेले अधिकारी आहेत आणि एआरसी रिकव्हरीसाठी ५ सेवकांची टीम आहे, असे सांगितले.

२६.२ मागील सभेमध्ये वसूलीसंदर्भात नियुक्त अधिका-यांचा तपशील विचारला होता. त्याबाबत माहिती देताना, श्री कश्यप यांनी सांगितले की, सेंट्रल रजिस्ट्रार नवी दिल्ली यांनी ७ सेवकांची नियुक्ती ही विशेष वसूली अधिकारी म्हणून केली आहे. त्यांचे द्वारे वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

२६.३ मागील सभेमध्ये बँकेच्या पॅनेलवरील वकीलांचा तपशील विचारला होता. त्याची पुढीलप्रमाणे माहिती श्री कश्यप यांनी सभेत सांगितली, बँकेच्या पॅनेलवर एकूण ३८३ वकील आहेत. या व्यतिरिक्त सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय येथील कामासाठी अन्य तज्ञ वकीलांची मदत गरजेप्रमाणे घेतली जाते.

२६.४ मागील सभेमध्ये विलफूल डिफॉल्टरची यादी प्रसिध्द करण्याची मागणी केलेली होती. त्याबाबत माहिती देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, न्यायालयाने याबद्दल काही निर्देश जारी केलेले आहेत. त्यामध्ये संबंधित कर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याची तरतूद आहे. त्याचे पालन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्याची

पुर्तता पुर्ण झाल्यावर ही यादी साधारणतः ऑक्टोबर २०२३ पर्यंत प्रसिध्द करता येईल. ही यादी तुर्तास मुख्यकचेरीमध्ये पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

२६.५ मागील सभेमध्ये बँकेने वसूलीपोटी दाखल केलेल्या दाव्यांची माहिती विचारलेली होती. त्याची माहिती देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, थकित कर्जापोटी बँकेने एनसीएलटी अंतर्गत १२, कलम १३८ अंतर्गत १०, वसूली दाखला अंमलबजावणीसाठी विविध सिव्हील कोर्टात २४ दावे सुरु आहेत. सुमारे १०१५ दाव्यांमध्ये लवाद दाखल्यासाठी दावे सुरु असून बँकेला अॅवॉर्ड देखील प्राप्त झालेले आहे. बँकेने २७५ लवाद दावे अहवाल वर्षात बँकेने दाखल केलेले आहेत. सरफेसी कायदयाअंतर्गत बँकेने १३६ प्रकरणी नोटीसा जारी केल्या असून ६६ मालमत्तांचा प्रतिकात्मक ताबा व १७ मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे व वसूलीची कार्यवाही सुरु केलेली आहे. त्यातील १२ प्रकरणांचे लिलाव जाहीर झालेले आहेत.

२६.६ मागील सभेमध्ये वसूलीसंदर्भातील तपशील विचारला होता. त्याबाबत माहिती देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, अहवाल वर्षामध्ये बँकेने एनपीए खातेसंख्या ही २५१९ वरुन १३०९ पर्यंत कमी करण्यात यश मिळविले आहे. तसेच एनपीए खात्यांमध्ये रु.१२४ कोटी मात्रची वसूली केलेली आहे. अहवाल वर्षामध्ये ग्रॉस एनपीए हा रु.३८८ कोटी वरुन रु.३३३.६४ एवढा कमी करण्यात यश मिळविले आहे. त्या प्रमाणे नेट एनपीए देखील रु.२११.६५ कोटी वरुन रु.१३७.७५ कोटी पर्यंत कमी झालेला आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये ग्रॉस एनपीए रु.२७५ कोटी पर्यंत कमी करण्याचा बँकेचा प्रयत्न आहे.

२७. श्री नंदकुमार गोसावी यांनी बँकेच्या ताळेबंद, नफा तोटा व वार्षिक अहवालामध्ये नमूद प्रगटने यावर प्रश्न विचारले होते. त्यास श्री कश्यप यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले.

२७.१ श्री नंदकुमार गोसावी यांनी Borrowrings मध्ये झालेल्या वाढीसंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, बॅारोईंग्ज अंतर्गत अहवाल वर्षात रु.२३२.७० कोटी एवढया रकमेची वाढ दिसत आहे. अहवाल वर्षअखेरीस बॅारोइंगची रक्कम रु.५५६.०१ कोटी एवढी होती. यामध्ये लॅाग टर्म डिपॅाझिट अंतर्गत सन २०२१–२२ मध्ये ग्राहकांकडून स्वीकारलेली लॅाग टर्म डिपॅाझिट रु.२०० कोटी समाविष्ट आहे. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशानुसार अहवाल वर्षाचे शेवटी बँकेने रु.१९५ कोटी रकमेची गुंतवणूक सिडबी बॅान्डमध्ये केली असून त्यासाठी शॅार्ट टर्म बॅारोईंग केलेले आहे. त्याची रक्कम यामध्ये समाविष्ट आहे. उर्वरित रु.१६१ कोटी ही रक्कम बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी उपलब्ध करुन दिलेल्या विविध सुविधांद्वारे व्याजदरातील चढ उतारांचा फायदा घेऊन आर्बीट्रेज मिळविण्यासाठी बँकेने बॅारोइंग्ज स्वरुपात उभी केली आहे.

२७.२ श्री नंदकुमार गोसावी यांनी Sundry Expenses मध्ये झालेल्या वाढीसंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर एकूण ६८ प्रकारच्या खर्चांचा यामध्ये समावेश होतो. तसेच कोविड १९ नंतर डिजीटल व्यवहारांमध्ये मोठया प्रमाणावर

वाढ झाली व त्यासंदर्भातील मोठी फी ही बँक देत असून त्याचा समावेश मुख्यत्वे यामध्ये आहे. तसेच यामध्ये त्याव्यतिरिक्त एटीएम चार्जेस, सॉफटवेअर यूपीआय स्वीच चार्जेस, एएमसी चार्जेस, सिबील चार्जेस, होम सेव्हिंग्ज एजन्ट चार्जेस इत्यादि चार्जेस देखील समाविष्ट आहेत. अशा प्रकारे समाविष्ट असलेल्या विविध खर्चांचे विश्लेषण उपलब्ध आहे. त्याची विस्तृत माहिती बँकेमध्ये भेट देवून घेता येईल असे श्री कश्यप यांनी नमूद केले.

२७.३ श्री नंदकुमार गोसावी यांनी Excess Provision Write Back रु.५३ कोटी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर श्री कश्यप यांनी माहिती सांगितली. त्यामध्ये नफा तोटा पत्रकामध्ये रु.१९६ कोटी रुपयांची तरतूद ही खर्चाची बाजू आहे. म्हणजेच जरी रु.५३ कोटी तरतूद जमा झाली असली तरी रु.१९६ कोटी तरतूद नावे पडली असल्यामुळे रु.१४३ कोटी रुपयांचा परिचलनात्मक नफा झालेला आहे. अकौन्टस स्टॅन्डर्डचे पालन बँक करत असून कुठल्याही प्रकारच्या तरतूदी हया नफा तोटा पत्रकाअंतर्गत येवून त्याचा परिणाम हा ताळेबंदामध्ये दर्शविला जातो असे सांगितले.

२७.४ श्री गोसावी यांनी Bad & Doubtful Debts Reserve अंतर्गत केलेली तरतूद ही रु.७९.८५ कोटींवरुन रु.६२.३६ कोटी एवढी केली असल्याचे सांगितले होते. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी अहवाल वर्षामध्ये एनपीए खात्यांमध्ये झालेल्या चांगल्या वसूलीमुळे ही घट असल्याचे सांगितले. तसेच मागील वर्षी ही तरतूद रु.७९.८५ कोटी एवढी केली होती. अहवाल वर्षअखेरीस ही तरतूद रु.६२.३६ कोटी एवढी खर्ची टाकली आणि रु.४७.३६ कोटी इतकी उत्पन्नात रिव्हर्स मिळाली. म्हणजेच नक्त स्वरुपात रु.१५ कोटी एवढी तरतूद करावी लागली. सन २०२१-२२ अखेरीस ही तरतूद रु.२७.१२ कोटी एवढी करावी लागली होती. अहवाल वर्षअखेरीस ही तरतूद करताना ती विशेषत्वाने रिक्वायर्ड प्रोव्हिजनपेक्षा अधिक केली आहे असे श्री कश्यप यांनी सांगितले.

२७.५ श्री गोसावी यांनी एआरसी रिसीट रक्कम व तरतूद या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्याची माहिती देताना श्री कश्यप यांनी सांगितले की अहवाल वर्षअखेरीस रु.४६० कोटी रकमांच्या एआरसी वसूलीसाठी शिल्लक असून त्यावर दि.३१.०३.२०२६ पर्यंत टप्प्याटप्प्याने तरतूद करावी अशी सूचना रिझर्व्ह बँकेने केलेली आहे. त्यानुसार बँकेने अहवाल वर्षअखेरीस रु.२८० कोटी एवढी तरतूद केलेली आहे. अहवाल वर्षामध्ये ए.आर.सी.मध्ये रु.६५ कोटी रकमेची वसूली झाली असून त्यातून एआरसी खर्च व फी वजा जाता रु.४३.६५ कोटी रकमेची निव्वळ वसूली झालेली आहे असे सांगितले.

२७.६ श्री गोसावी यांनी टॉप १०० डिफॉल्टर यादी संबंधी माहिती विचारली होती. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी हा तपशील हा बँकेमध्ये तयार असून सभासदांना पाहणीसाठी उपलब्ध असल्याचे नमूद केले.

२७.७ श्री गोसावी यांनी राईट ऑफ खात्यांमधील वसूली संदर्भात माहिती विचारली होती. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, सन २०२३ मध्ये रु.४.६७ कोटी व सन २०२२ मध्ये रु.४.९९ कोटी एवढया रकमेची वसूली राईट ऑफ खात्यांमध्ये झाली. सन २०२३ मध्ये राईट ऑफ खात्यावरील वसूलीचे उद्दिष्ट रु.२१ कोटी

एवढे निश्चीत केले होते. मात्र प्रत्यक्षात रु.४.६७ कोटी एवढीच वसूली झाली. यामध्ये ज्या खातेदाराकडून मोठी रक्कम वसूल होण्याची अपेक्षा होती त्या खातेदाराचे आकस्मिक निधन झाले. व त्यांच्या वारसांची नावे तारण मिळकतीस लावून कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन या आर्थिक वर्षात ती रक्कम वसूल होईल असे वाटते. अन्य एका मोठया वसूलीबाबत ऐनवेळी मिळकत खरेदी करणा–या ग्राहकाने माघार घेतल्यामुळे विक्रीचा व्यवहार पुर्ण होऊ शकला नाही. या वर्षी तो व्यवहार पुर्ण होईल अशी आशा वाटते. या आर्थिक वर्षासाठी राईट ऑफ खात्यांवरील वसूलीचे उद्दिष्ट रु.१७ कोटी एवढे घेतले आहे. कर्ज खाते निरस्त करताना तारण असलेल्या मिळकतीच्या विक्रीचा प्रयत्न केलेला असतो. परंतू ग्राहक उपलब्ध होत नसल्यामुळे व १०० टक्के तरतूद झालेली असल्यामुळे कर्ज खाते निरस्त करण्याचा निर्णय घेतला जातो. अन्य कर्जांचे बाबत तारण असलेली मिळकती विक्री करून राहिलेली रक्कम ही रीटर्न ऑफ केली जाते. अनेक वेळा कर्जदार आजारी पडल्याने, व्यवसायात अचानक नुकसान झाल्याने कर्जदाराची परतफेडीची क्षमता नाहीशी होते, अशी कर्जे निरस्त करावी लागतात.

२७.८ श्री गोसावी यांनी वैधानिक लेखापरिक्षक यांचे अहवालामध्ये कलम क्र.९ सी अंतर्गत नमूद रकमांचा तपशील विचारला होता. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, त्यामध्ये रु.२७०.७१ कोटी एवढी रक्कम ही संशयित व बूडित कर्ज खात्यांसंदर्भात आहे. रु.३१.१९ कोटी ही रक्कम अनुत्पादित गुंतवणूक व रु.६४.४८ कोटी ही रक्कम नॅान बँकिंग ॲसेट संदर्भातील आहे. नॅान बँकिंग ॲसेटमध्ये बँकेने सन २०२१ साली काही थकित एनपीए कर्जदारांच्या मालमत्ता लिलावात खरेदी केल्या होत्या त्याची रक्कम समाविष्ट आहे. सन २०१२ साली निरस्त केलेल्या चेन्नई येथील एका थकित कर्जदाराची तारण मालमत्ता रु.३७.५१ कोटी अधिक रजिस्ट्रेशन खर्च रु.४.०० कोटी म्हणजेच रु.४१.५१ कोटी इतक्या रकमेस खरेदी केली होती. ती दि.११.०५.२०२३ रोजी रु.४५ कोटी इतक्या रकमेला बँकेने विक्री केली आहे. तसेच मुंबई येथील एका थकित कर्जदाराची मालमत्ता रु.२२.५० कोटी एवढया रकमेला बँकेने खरेदी केली होती. ती साधारणतः पुढील २ वर्षात विक्री करुन अथवा कर्जदाराकडून कर्ज रक्कम वसूल करुन ती निरस्त करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

२७.९ श्री गोसावी यांनी टॅाप १०० बॅारोअर्स यांची विस्तृत माहिती मागितली होती. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी ही गोपनियतेच्या मुद्यांचा विचार करता प्रसिध्द करता येणार नाही. मात्र रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी फायनान्शिअल ॲन्ड डिसक्लोजर्स यासंदर्भात प्रकाशित केलेल्या निर्देशांनुसार यासंदर्भातील माहिती ही सारांश रुपाने वार्षिक अहवालामध्ये नमूद केलेली आहे अशी माहिती दिली.

२७.१० श्री गोसावी यांनी शाखानिहाय एनपीए आकडेवारी देण्याची मागणी केली होती. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की बँकेचा एनपीए हा एकत्रित स्वरुपात तयार होतो व त्यावर तरतूद केली जाते. मात्र शाखानिहाय एनपीए ची माहिती तयार असून ती मुख्यकचेरीमध्ये अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

२७.११ श्री गोसावी यांनी पौड रोड शाखेमधील एनपीए वसूली संदर्भात केलेल्या प्रयत्नांबाबत अनुकूल मत व्यक्त केले होते. त्याबद्दल श्री कश्यप यांनी धन्यवाद व्यक्त केले.

२७.१२ श्री गोसावी यांनी दि.२९.०६.२०२३ रोजी अध्यक्ष, सर्व संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावाने एक पत्र पाठविले होते. त्याचे उत्तर श्री रविंद्र हेजीब हे शेवटी देतील असे श्री कश्यप यांनी सांगितले.

२८. श्री श्रीकांत साठे यांनी बँकेकडे ईमेलद्वारे व पत्र पाठवून काही माहिती विचारली होती. ही माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दयावी अशी त्यांची सूचना होती. त्यानुसार श्री कश्यप यांनी श्री साठे यांनी विचारलेल्या बाबींविषयी पुढील प्रमाणे माहिती सभेमध्ये दिली.

२८.१ श्री साठे यांनी बँकेला ठेवींवरील दंड व्याजाचा तपशील हा ठेवींदारांना ठेवी स्वीकारताना स्पष्टपणे निदर्शनास आणला पाहिजे असे कळविले होते. अशा प्रकारे तपशील निदर्शनास न आणल्यास बँकेला ठेवी मूदतपुर्व बंद करताना दंड व्याज घेता येणार नाही. त्यासंदर्भातील रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक दिनांक ०३.०३.२०१६ श्री साठे यांनी बँकेला पाठविले आहे. त्याचप्रमाणे ठेव योजनेचे नियम हे अर्जावर नमूद करुन त्यावर ठेवीदारांची संमती घेवून त्याची प्रत रेकॅार्डवर ठेवणे आवश्यक आहे असे नमूद करुन श्री साठे यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडून माहितीच्या अधिकारात मिळालेली माहिती त्यांनी दि.२५.११.२०२२ रोजी पाठविली आहे.

त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, श्री साठे यांच्या सूचनेची नोंद घेवून जुन्या को-या ठेव फॉर्मवर त्या संबंधीचा शिक्का उमटवून त्याची कार्यवाही सुरु केली आहे. तसेच ठेव व्याजदराचे परिपत्रकामध्ये सुध्दा तसा बदल केलेला असून त्याची प्रत बँकेच्या वेबसाईटवर उपलबध केलेली आहे. नवीन फॉर्म छापून घेताना त्याचा समावेश त्यामध्ये करुन घेत आहोत. तसेच काऊटरवरुन खातेदारांना ठेव योजनेची माहिती दिली जात आहे. तसेच श्री साठे यांनी केलेल्या सूचनेबद्दल श्री कश्यप यांनी त्यांना धन्यवाद दिले.

२८.२ नवीन फ्लेक्सी डिपॉझिट स्कीम श्री साठे यांनी बँकेला सादर केली होती. त्यावर विवेचन करताना श्री कश्यप यांनी सांगितले की, अशा प्रकारची योजना ही चालू ठेव खात्यासाठी उपलब्ध आहे. त्या स्कीमचे नांव स्वधन ठेव आहे. अन्य बँकांमध्ये चालू ठेव खात्यावर व्याज दिले जात नाही. मात्र जनता बँकेमध्ये चालू ठेव खात्यावरील ठराविक रकमेच्या वरील रक्कम ही स्वधन खात्यामध्ये आपोआप वर्ग होवून त्यावर प्रचलित दराने – सध्या ३% दराने व्याज दिले जाते. श्री साठे यांनी सूचविलेल्या स्कीमचा अभ्यास केला असता ही योजना बँकेच्या दृष्टीने व्यवहार्य वाटत नाही. मात्र श्री साठे यांनी ठेव योजनेबाबत केलेला अभ्यास निश्चीतच कौतुकास्पद आहे.

२८.३ श्री साठे यांनी एम.एस.सी.एस.ॲक्ट २००२ चे कलम ४२ अंतर्गत निर्णयप्रणालीमध्ये सेवकांचे सहभागाची पुर्तता करणेविषयी कळविले होते. तसेच त्यांनी बँकेला दि.२३.०५.२०२३ रोजी त्यासंदर्भातील सेंट्रल रजिस्ट्रार यांचे दि.०९.०६.२०१७ रोजीचे परिपत्रकही पाठविले. तदनंतर श्री साठे यांनी दि.०८.०६.२०२३ रोजी सेवक प्रतिनिधी

यांची नावे संचालक फलकावर प्रसिध्द करुन त्यांची नावे प्रसिध्द करण्याची मागणी केली. त्यास बँकेने दि.०८.०६.२०२३ रोजी उत्तर दिले होते. त्यावर श्री साठे यांनी दि.१७.०६.२०२३ रोजी प्रस्तुत मुद्दयावर बँक व त्यांचेमध्ये असहमती असल्याचे सांगितले व सेंट्रल रजिस्ट्रार यांचेकडे हा विषय नेलेला असल्याचे कळविले आहे. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी पुढील माहिती दिली. एम.एस.सी.एस.ॲक्ट २००२ चे कलम ४२ मध्ये Association of Employees in Management Decision Making Process असे नमूद केलेले आहे. या अंतर्गत निर्णय प्रणालीमध्ये सेवकांचा सहभाग या निकषाची बँक पुर्तता करत असून श्री साठे यांना तसे दि.०८.०६.२०२३ रोजी कळविले आहे. सेंट्रला रजिस्ट्रार यांचे परिपत्रका मध्ये नमूद केलेल्या दुस–या पर्यायानुसार बँक कार्यवाही करत असून पुर्तता करत आहे. तसेच त्यांचे असहमतीची नोंद बँकेने घेतली आहे.

२८.४ श्री साठे यांनी यूनिटी स्मॉल फायनान्स बँक यांची ठेव योजना बँकेला सादर केली. त्याबाबत श्री कश्यप यांनी पुढील माहिती दिली. प्रत्येक बँक ही त्याचेकडे असलेल्या ग्राहक वर्गाला अनुसरुन तसेच त्यांचेकडील अल्को कमिटीच्या शिफारशीनुसार व बँकेच्या गरजेनुसार ठेव योजना सादर करत असते. श्री साठे यांच्या सूचनेबद्दल श्री कश्यप यांनी त्यांना धन्यवाद दिले.

२८.५ बँकेच्या वेबसाईटवर नमूद शेडयुल्ड बँक तपशील यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करावी अशी सूचना श्री साठे यांनी केली होती. याअंतर्गत यथायोग्य दुरुस्ती बँकेने दि.१५.०३.२०२३ रोजी करुन श्री साठे यांना तसे कळविले देखील आहे.

२८.६ श्री साठे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेमध्ये विषय क्र.३९ एल व ३९ एन नमूद करणेबाबत कळविले होते. तसेच यापुर्वी हा विषय त्यांनी दि.२८.०९.२०२२ रोजीसुध्दा कळविला होता. त्यानंतर त्यांनी दि.०४.०७.२०२३ रोजी ईमेलद्वारे कलम क्र.३९ ची प्रत बँकेकडे पाठवून यानुसार सभेची विषय पत्रिका नसल्याचे कळविले आहे. त्याच प्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सत्कार समारंभाचे आयोजन न करण्याबाबत पुन्हा सांगितले आहे.

त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. एम.एस.सी.एस.ॲक्ट २००२ मधील कलम ३९ अंतर्गत विषय एल हा संचालकांचे अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक सेवकांचा तपशील सादर करणे याविषयी आहे. अहवाल वर्षामध्ये हा तपशील निरंक असल्यामुळे स्वतंत्ररित्या वार्षिक अहवालातील विषय पत्रिकेमध्ये नमूद केलला नव्हता. सभासदांना वितरित केलेल्या छापील पत्रिकेमध्ये आयत्या वेळचा विषय क्र.१ म्हणून हा विषय व त्याचा निरंक तपशील नमूद केलेला आहे. एम.एस.सी.एस.ॲक्ट २००२ मधील कलम ३९ अंतर्गत विविध विषय उदा. Explusion of Members, Review of Operational Deficit, Creation of specific reserves and funds इत्यादि विषय For the purpose of Annual

General Meeting म्हणून नमूद केलेले आहेत. त्यापैकी जे विषय आवश्यक असतात ते विषय वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेमध्ये नमूद केले जातात व सभेच्या समोर मंजूरीच्या निर्णयार्थ सादर होतात. तसेच श्री साठे यांचे सत्कार समारंभ न घेण्याचे सूचनेची नोंद बँकेने घेतली आहे.

२८.७ श्री साठे यांनी ईमेलद्वारे पुढील मुद्दे उपस्थित केले आहेत. ज्यामध्ये सन २०२२-२३ चा रिझर्व्ह बँक तपासणी अहवाल मिळावा. त्यामध्ये कोणत्या प्रतिकूल बाबी आहेत ते सांगावे. तसेच बँकेने त्याला काय उत्तर दिलेले आहे ते दयावे. रिझर्व्ह बँकेने कोणती नवीन बंधने घातलेली आहेत. याची माहिती विचारली होती.

त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेचा तपासणी अहवाल हा गोपनिय असून त्यांचे संमती शिवाय अन्य कोणालाही तो देता येत नाही.

एम.एस.सी.एस.ॲक्ट २००२ अंतर्गत बँकचे कामकाज होते याची पाहणी अथवा केवळ कलम ७३ अंतर्गत आर्थिक पत्रकांचे विश्लेषण वैधानिक लेखा परिक्षकांकडून होते याची माहिती श्री साठे यांनी विचारली होती. त्यास उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, वैधानिक लेखा परिक्षकांचे कामाची व्याप्ती ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशांनुसार तसेच एम.एस.सी.एस. ॲक्ट २००२ मधील कलम ७३ नुसार आहे.

प्रशासन विभागाचे लेखा परिक्षण कसे होते याची माहिती श्री साठे यांनी विचारली होती. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी सांगितले की, बँकेच्या सर्व विभागांचे वैधानिक लेखा परिक्षण हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ मधील तरतुदींनुसार होत असते. या शिवाय कॅास्ट ऑडिट, कंकरंट ऑडिट, रिस्क बेस्ड इंटर्नल ऑडिट, स्नॅप ऑडिट इत्यादि माध्यमातुन देखील विविध विभागांचे लेखा परिक्षण करण्यात येते.

श्री साठे यांनी वैधानिक लेखा परिक्षक यांना फोन केला असल्याचे नमूद केले होते. श्री साठे यांनी वैधानिक लेखा परिक्षक यांना फोनवर प्रश्न विचारला असता त्यांनी संबंधित प्रश्न हे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये विचारा असे उत्तर दिल्याचेही श्री साठे यांनी नमूद केले होते. तसेच वैधानिक लेखा परिक्षक यांना वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये येण्यासंबंधी सूचना दयावी असे श्री साठे यांनी कळविले होते. त्यावर श्री कश्यप यांनी वैधानिक लेखा परिक्षकांनी त्यांचा अहवाल हा दिलेला आहे. तो अहवाल सर्व सभासदांना पोस्टाने पाठविला असून तो वार्षिक अहवालामध्ये देखील दिलेला आहे असे सांगितले. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वैधानिक लेखा परिक्षक उपस्थित असतात असे नमूद केले.

२८.८ बँक दरवर्षी नफयामधून १ टक्का रक्कम शैक्षणिक फंडाला वर्ग करत आहे. त्याबाबत श्री साठे यांनी मागील १० वर्षामध्ये कोणत्याही शैक्षणिक कार्यक्रमाचे निमंत्रण आले नसल्याचे कळविले होते. तसेच बँक सभासदांसाठी

शैक्षणिक कार्यक्रम घेते का ? घेत नसल्यास का घेत नाही ? असे विचारले होते. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी पुढील माहिती दिली.

एम.एस.सी.एस.ॲक्ट २००२ कलम ६३ बी नुसार बँक दरवर्षी १ टक्का रक्कम ही शैक्षणिक फंडाला वर्ग करत आहे. हा फंड नॅशनल को–ऑपरेटिव्ह यूनियन ऑफ इंडिया यांचे अखत्यारीतील आहे. नफा वाटणीस वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर ही रक्कम त्यांचेकडे विहित कालावधीत पाठविली जाते.

बँकेचे एकूण १.७५ लाख सभासद आहेत. प्रत्येक सभासदाला व्यक्तिगतरित्या शैक्षणिक कार्यक्रमांचे निमंत्रण हे सभासदांची एकूण संख्या विचारात घेता शक्य होणारे नाही.

बँक सभासदांसाठी नेहमीच शैक्षणिक कार्यक्रमांचे पुढील माध्यांतून आयोजन करत असते.

१. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये

२. शाखेमध्ये आयोजित गुंतवणूक व वर्धापना दिनानिमित्त

३. फेसबूक, टिवटर, फेसबूक, वेबसाईट इत्यादि सोशल मिडियाद्वारे

४. ईमेल व शॉर्ट मेसेज याद्वारे, नोटीस बोर्ड या माध्यमांतून

२८.९ वार्षिक अहवालातील पान क्र.२८ डी अंतर्गत बॅड ॲन्ड डाऊटफुल डेब्टसची तरतूद यामध्ये ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडे दिलेल्या कर्जाचा समावेश नाही असा प्रश्न विचारला होता. त्यावर उत्तर देताना श्री कश्यप यांनी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीकडे सोपविलेल्या कर्जासंबंधीची तरतूद ही बॅड ॲन्ड डाऊटफूल डेब्टस तरतूदद्वारे न होता ती आयडीआर तरतूदीद्वारे केली जाते. या संबंधी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी दि.२४.०९.२०२१ व दि.२८.०६.२०२२ रोजी परिपत्रके जारी केली असून त्यांचे पालन बँक करत आहे असे सांगितले.

वरील प्रमाणे श्री साठे यांचे प्रश्नासंबंधी श्री जगदीश पुरुषोत्तम कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विस्तृत विवेचन केले. या विवेचनानंतर श्री साठे यांनी त्यासंबंधी अधिक माहिती विचारली नाही.

तदनंतर श्री कश्यप यांनी त्यांचे भाषणाचे शेवटी यासंदर्भात सभासदांना काही अधिक माहिती अथवा शंका असल्यास त्यांनी वैयक्तिक स्वरुपात संपर्क साधावा अशी विनंती केली. त्यानंतर श्री कश्यप यांनी उपस्थित सर्व सभासदांना धन्यवाद दिले व त्यांचे आभार मानले.

श्री.जगदीश पुरुषोत्तम कश्यप, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या वरील माहितीबद्दल संबंधित सभासदांनी समाधान व्यक्त केले.

त्यानंतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी श्री नंदकुमार गोसावी यांनी बँकेला पाठविलेल्या दि.२९.०६.२०२३ रोजीचे पत्रासंबंधाने पुढीलप्रमाणे विवेचन केले. श्री गोसावी यांनी त्यांचे दिनांक २९/०६/२०२३ चे पत्र बँकेमध्ये समक्ष दिनांक ०३/०७/२०२३ रोजी आणून दिलेले आहे. त्यात त्यांनी बँकेच्या वार्षिक सर्व साधारण सभेत काही

मुद्दे उपस्थित करण्याबद्दल, सभेत बोलण्या बद्दल परवानगी मागितली होती त्यानुसार त्यांनी आजचे सभेमध्ये सविस्तरपणे सर्व मुद्दे मांडलेले आहेत त्या मुद्यांना तपशीलवार उत्तर देत आहे.

सभेमध्ये सत्कार करू नये असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे व त्यासाठी मल्टीस्टेट कायद्यातील कलमांचा आधार घेतला आहे. मल्टीस्टेट सोसायटी रुल १६/५ प्रमाणे स्थगित सभेनंतर अजेंड्याव्यतिरिक्त कोणताही विषय घेता येत नसल्याचे विशेषतः सत्कार करू नये असे आपण नमूद केले आहे. गेली अनेक वर्षे बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बँकेच्या ज्या सभासदांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे अशा सभासदांचेच सत्कार केले जातात, असे सत्कार करू नये असे आपले म्हणणे आहे. यातून काहीच आर्थिक फायदा होत नाही असे ही आपण नमूद केले आहे. सहकारी संस्थेचा उद्देश हा केवळ नफा कमवणे असा नसतो, तर समाजातील सर्व घटकांचा विकास व्हावा असा असतो, ज्या सभासदांनी काही उत्कृष्ट कामगिरी केली असेल तर त्याचे कौतुक करणे हा बँकेच्या दृष्टीने व सर्वच सभासदांच्या दृष्टीने आंनदाचा व भूषणास्पद विषय असतो. अशा सत्कारातून अनेक होतकरू सभासदांना प्रेरणा मिळते व त्यांच्या विकासाला चालना मिळते.त्यामुळे अनेक सभासदांनी अशा प्रकारे सत्कार करण्याबद्दल आनंद व्यक्त केला असून आवश्यकतेनुसार व कायद्याचे पालन करून असे सत्कार केले जातील याची नोंद घ्यावी.

श्री अनिल गचके यांना तज्ञ संचालक म्हणून घ्यावे असे श्री गोसावी यांनी पत्रामध्ये नमूद केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, सदर विषयावर आपण मागील सभेत सूचना मांडली होती व या विषयावर आपण बराच वेळ चर्चा केलेली होती, आपल्या प्रमाणेच अनेक सभासदांनी अशाच सूचना केलेल्या होत्या, बँकेच्या मागील सभेच्या वृतांता मध्ये देखील याचा उल्लेख आहे. सदर वृतान्ताची प्रत आजच्या सभेत सर्वांना दिलेली आहे. या बाबत आपल्या या सूचनेची पुन्हा केवळ नोंद घेतली आहे. सबब, या विषयाला येथे पूर्णविराम देत आहे.

बँकेचे चेअरमन सभासदांना भेट देत नाहीत असे विधान श्री गोसावी यांनी पत्रामध्ये केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, बँकेचे चेअरमन हे सर्व सभासदांना भेट देत असतात, सभासदांबरोबर चर्चा देखील करतात, आपण व्यवस्थित फोन करून वेळ घेतली तर आपल्याला देखील भेट देता येईल. अनियोजित भेटी साठी कदाचित अधिक वेळ थांबावे लागेल. केबिन मध्ये कोणीही नाही तरी आपल्याला भेट दिली नाही हा गैरसमज आहे. ऑनलाईन मिटींग, वेबिनार सुरु असल्याने आपल्याला त्या दिवशी भेट देता आली नाही, मात्र दुसऱ्या दिवशी बँकेच्या सचिवांनी आपल्याशी संपर्क साधून भेटण्या बद्दल आपल्याशी चर्चा देखील केली होती त्यावेळी आपण बाहेरगावी असल्याचे नमूद केले होते त्यानंतरही आपणांस पुन्हा फोन करून भेट

घेण्याबद्दल संपर्क केला होता मात्र आपण त्याबाबत काहीही कळवले नाही. आपण पत्रामध्ये अनेक ठिकाणी शिष्टाचाराचा उल्लेख केला आहे परंतु आपण असे कोणतेही संकेत पाळताना दिसत नाहीत असे नमूद केले. अध्यक्ष यांचे वास्तव्य पुण्यामध्ये नव्हते व त्यांचा सभासदांशी संपर्क नाही हे केलेले आरोप तर्कहीन व निराधार आहेत. आपल्याशी संपर्क आलेला नाही याचा अर्थ सभासदांशी फारसा संपर्क नाही असा होत नाही. असे श्री हेजीब यांनी सांगितले. बँकेच्या विविध शाखेतील ग्राहकांशी, सभासदांशी तसेच विधायक व समाजाभिमुख कार्य करणाऱ्या लोकांशी व संस्थांशी उत्तम संपर्क आहे. भागधारकांशी जिव्हाळ्याचे संबंध म्हणजे आपल्याला नेमके काय म्हणावयाचे आहे हे समजू शकलेलो नाही, सर्व सभासदांशी सौहार्दाचे चे संबंध आहेत, या सूचनेतून आपला माझ्याप्रती असलेला आकस दिसून येत आहे, आपण स्वभावात बदल केल्यास आपल्याशी देखील सौहार्दाचे संबंध निर्माण होऊ शकतात असे अध्यक्ष यांनी स्पष्ट केले.

मल्टीस्टेट कायद्याच्या कलम ४२ नुसार बँकेच्या संचालक मंडळावर सेवक प्रतिनिधी घेतला पाहिजे असे श्री गोसावी यांनी पत्रात नमूद केले आहे. यास श्री कश्यप यांनी विस्तृत उत्तर दिलेले आहे.

मागील सभेत कोणताही विषय मांडू दिला नाही. असे श्री गोसावी यांनी पत्रामध्ये नमूद केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, सभासंकेता प्रमाणे आपले विषय नव्हते तरी देखील सूचना म्हणून आपल्याला विषय मांडण्याची परवानगी दिली होती. आपण सुमारे १० मिनिटे चुकीच्या पद्धतीने मुद्दे मांडत होतात. आपल्या चुकीच्या व दुराग्रही सुचनांमुळे अन्य सभासदांनी देखील अशा प्रकारच्या सूचना मांडण्याचा प्रकार सुरु केला होता. सबब, आपल्या चुकीच्या देखील सूचनेची सभेमध्ये नोंद घेतली गेली आहे. आपण केलेल्या अयोग्य सूचनेची बँकेने कम्पलसरी अंमलबजावणी करावी असा आपला दुराग्रह असून सभेत विषय मांडू देत नाही असे बोलणे हे सर्वथा अनुचित आहे.

सभेमध्ये विषय मांडण्याची परवानगी द्यावी असे देखील पत्रात नमूद केलेले आहे. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की आपल्या पत्रानुसार बँकेने आपणास आपले विषय मांडण्याची पूर्ण संधी दिलेली आहे. जे विषय सभाशास्त्राला अनुसरून आणि सभेच्या उद्देशाला, विषयपत्रिकेला अनुसरून असतील तर त्यावर नक्की विचार केला जाईल. चुकीचे व गैरलागू मुद्दे, विषय असतील तर असे विषय विचारात घेतले जाणार नाही. आजच्या सभेमध्ये देखील आपण व सर्व इच्छूक सभासद यांनी आपापले मुद्दे मांडले आहेत व प्रश्न देखील विचारले आहेत. प्रश्न विचारताना काही सभासदांना अन्य सभासदांनी रोखले असता प्रसंगी अध्यक्ष यांनी हस्तक्षेप करुन संबंधित सभासद यांना त्यांचे प्रश्न विचारून मत मांडू दिले आहे.

वरिष्ठ नेते राजकीय व्यक्तीकडून दबाव आणला जातो असे श्री गोसावी यांनी पत्रामध्ये नमूद केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, बँक कुठल्याही व्यक्तीवर कोणामार्फतही राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव आणत नाही आणि तशी बँकेची भूमिका देखील नाही. आपण राजकीय क्षेत्रात काम करत असल्याचे समजते, सबब, आपण केलेला आरोप हा राजकीय स्वरूपाचा आहे.

सन २०२२-२०२७ ची निवडणूक बिनविरोध पार पडली, कशी पडली कोणामुळे पार पडली हा मुद्दा श्री गोसावी यांनी पत्रात नमूद केलेला आहे. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, मागील वर्षी बँकेची निवडणूक बिनविरोध पार पडली या बद्दल मी सर्व सभासदांचे पुन्हा एकदा मनापासून आभार व्यक्त करतो आणि धन्यवाद देतो. बँकेची निवडणूक ही बिनविरोध पार पडली याला कोणी एक व्यक्ती कारणीभूत नसून संपूर्ण १७५००० सभासदांचे हे श्रेय आहे याची नोंद घ्यावी. बँकेची निवडणूक ही लोकशाही प्रक्रिया असून बिनविरोध निवडणुकीमुळे नुकसान व वेळ वाचला हा आपला विचार आहे व तो काही अंशी बरोबर देखील आहे. लोकशाहीची मूल्ये राखण्यासाठी, अनिष्ट रुढी अथवा प्रघात पडू नये या करिता काही वेळेला निवडणूक देखील होणे आवश्यक असते त्यातून लोकशाही व तिची ,मुल्ये जिवंत राहतात व आपापसातील गैरसमज दूर होण्यास मदत होते.

सभासदांना डिव्हिडंड दिला नाही व मिठाईचे बॉक्स दिले असे विधान श्री गोसावी यांनी पत्रामध्ये केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, डिव्हिडंड देत नसल्या बद्दल तुमच्या प्रमाणे मला, माझ्या सर्व संचालक सहकार्यांना, बँकेच्या सेवकांना निश्चित खंत वाटत आहे या बद्दल मागील सभेत उल्लेख ही केला होता व त्याला आपण दुजोरा दिला होतात. सन १९९८ ते २०११ या कालावधीत बँकेची आर्थिक स्थिती नाजूक होती त्यामुळे बँकेकडे अन्य बँकाप्रमाणे पुरेसे रिझर्व्ह तयार होऊ शकले नाहीत. मागील २ वर्षे कोरोना स्थिती होती त्यामुळे अनेक व्यवसायांवर मोठे गंडांतर आले सबब, बँकेची कर्जे ही एनपीए झाली व त्या पोटी बँकेस नफ्यातून मोठी तरतूद करावी लागली आणि डिव्हिडंड साठी पुरेशी रक्कम उपलब्ध झाली नाही. अन्य बँकाप्रमाणे बँकेकडे पुरेसे रिझर्व्ह उपलब्ध असते तर बँकेस प्रोव्हिजन करावी लागली नसती व डिव्हिडंड देता आला असता. रिझर्व्ह बँक देखील नियमानुसार पुरेशा तरतुदी केल्यानंतरच डिव्हिडंडची परवागनी देईल सबब बँकेने डिव्हिडंड दिलेला नाही. बँकेने सन २०२० पासून सभासदांना डिव्हिडंड दिलेला नाही या बद्दल प्रत्येक वार्षिक सभेमध्ये सांगोपांग चर्चा झाली आहे. डिव्हिडंड का दिलेला नाही या बद्दल मागील सभेत देखील सविस्तर चर्चा झाली होती व २०२३ साली डिव्हिडंड देणे शक्य नसल्याबादल ही सांगितले होते, आणि आपणही अजून एक वर्ष डिव्हिडंड नाही दिला तरी चालेल पण बँकेचा ताळेबंद

मजबूत झाला पाहिजे असा विचार मांडला होता जो की सभेच्या वृतातंत नमूद आहे त्याच बरोबर सदर संचालक मंडळ नव्याने निवडून आलेले आहे त्यांना काम करू दिले पाहिजे असे आपण नमूद केले होते. पुढील वर्षी डिव्हिडंड देण्याची स्थिती येऊ शकेल असे वाटते. सभासदांना मिठाई बॉक्स देऊन खुश केले जाते हा संपूर्ण १७५००० सभासदांचा आपण अपमान केलेला असून मी त्याचा तीव्र शब्दात निषेध करतो. बँकेचे सभासद हे मिठाई बॉक्स साठी सभेस येतात हा आपला आरोप अतिशय घृणास्पद असून सभासदांच्या नैतिकते वर आपण केलेला आरोप हा केवळ आणि केवळ निषेधार्ह आहे सभेची वेळ ही दुपारी ३ ते ५ च्या दरम्यानची असते आणि सभासंकेतानुसार व आपल्या भारतीय संस्कृती नुसार आलेल्या सभासदांचे आदरातिथ्य करणे या दृष्टीकोनातून सभासदांना रिफ्रेशमेंट साठी चहा व अल्पोपहाराची व्यवस्था केली जाते. बँकेच्या लीगल टीम बरोबर बैठक करणे, मोठ्या थकीत कर्जदाराची माहिती, निरस्त केलेल्या खात्यांची माहिती व बँकेच्या मोठ्या कर्जदाराची माहिती देणे बद्दल पत्रात नमूद केले आहे. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, सदर विषयाबद्दल बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या प्रश्नांना मागील सभेमध्येच उत्तरे दिली होती, ती वृतांतात नमूद आहेत, तरी देखील आपल्या विनंती नुसार पुन्हा समक्ष भेटण्यासाठी १ जुलै रोजी वेळ दिली होती त्याची आपण आपल्या डायरी मध्ये नोंद देखील केलेली होती, वेळ घेऊनही आपण आलेले नसल्याने, पुन्हा आपणांस फोन करून लीगल टीमला भेटण्यासाठी नव्याने वेळ दिली होती मात्र आपण आला नाहीत आणि अनियोजित वेळी अध्यक्ष भेट देत नाही याचा उल्लेख मात्र आपण करता हे योग्य नाही . जी माहिती कायद्यानुसार देता येणे शक्य आहे ती नक्कीच आपल्याला देण्यास काहीच हरकत असण्याचे कारण नाही. आपण केव्हाही पूर्वनियोजित वेळेनुसार बँकेच्या संबधित विभागात भेट घेऊन त्याची माहिती घेऊ शकता, चर्चा करू शकता. मोठे थकबाकीदार, निरस्त केलेल्या खात्यांची माहिती मुख्य कचेरी मध्ये अवलोकनार्थ उपलब्ध आहे, आपणांस ती हवी असल्यास ती उपलब्ध करून दिली जाईल. मोठे कर्जदाराची माहिती गोपनीयता कायद्यानुसार आपणास देता येणार नाही. आपण स्वत: कायदा विषयातील तज्ञ असल्याचे समजते. कोणी कर्ज घेतले, कोणाच्या खात्याची बाकी काय आहे याची माहिती आपल्याला देता येणार नाही, एका खातेदाराची माहिती दुसऱ्या कोणालाही देता येत नाही मात्र ज्यांची कर्जे थकली आहेत व वसुलीसाठी बँकेने लिलाव काढलेले आहेत अथवा कोर्ट केस सुरु आहेत अशी माहिती देता येऊ शकते, याची आपण नोंद घ्यावी. अन्य कोणाची माहिती त्रयस्थास देणे हा बँकेने त्यांचे खातेदार कर्जदार यांचे बरोबर केलेला गोपनीयतेचा भंग धरला जातो सबब, ही माहिती देता येणार नाही.

श्री माटे यांना चेअरमन करणे बँकेच्या हिताचे आहे असे पत्रात नमूद केले आहे. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की , श्री माटे यांचे बँकेतील योगदान आजही तितकेच आहे जितके ते चेअरमन असताना होते. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ आज देखील बँक घेत आहे व श्री माटे हे देखील तितक्याच तत्परतेने सर्व विषयात रस घेऊन सहभागी होत असतात. संचालक मंडळाच्या निवडणुकीनंतर कोणाला चेअरमन करावे या बद्दल शासन नियुक्त मा निवडणूक अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली लोकशाही पद्धतीने अशी निवडप्रक्रिया पार पडत असते, चेअरमन निवडीचा विषय संचालक मंडळातील सर्व संचालकांच्या सर्वसहमतीने निवडणूक अधिकारी यांचे समक्ष झालेला आहे.

बँकेचा अहवाल हा बँकेच्या हिताचा नाही असे विधान श्री गोसावी यांनी पत्रामध्ये केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, मुळात बँकेचा अहवाल हा बँकेच्या हिताचा अथवा अहिताचा ऐवजी तो आर्थिक स्थितीचे व बँकेच्या वस्तुस्थिती चे दर्शन घडवणारा असतो, तो बी आर अ‍ॅक्ट नुसार व रिझर्व्ह बँकेने मान्य केलेल्या पद्धतीनेच तयार करावा लागतो. तसेच तो सनदी लेखापाल,ऑडीटर यांचेकडून पूर्ण तपासून सर्टिफाय करून घेतलेला असतो त्यामध्ये ऑडीट करताना जी तत्वे अंगिकारली आहेत त्या नुसार ऑडीट केले जाते, सदर अहवाल व ऑडीट रिपोर्ट प्रत्येक वर्षी सर्वसाधारण सभेमध्ये संमत करून घेतला जातो बँकेच्या अहवालात मागील वर्षीच्या तुलनेत प्रगती झालेली दिसून येते, येथून पुढे देखील बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहील सबब, आपण केलेल्या विधानाशी मी व माझे सर्व सहकारी सहमत नाहीत. सदर अहवाल हा भागधारकांच्या हिताचा नाही या आपल्या मुद्द्यांची नोंद घेतली आहे.

बँकेप्रती असंतोष व्यक्त होऊन रूपी बँकेसारखी अवस्था होईल असे मत श्री गोसावी यांनी पत्रामध्ये व्यक्त केले होते. त्यास उत्तर देताना श्री हेजीब यांनी सांगितले की, बँकेचे असणारे हितचिंतक, संयमी सभासद, निस्वार्थी संचालक मंडळ, व प्रामाणिक सेवक आणि बँकेप्रती अपार प्रेम व श्रद्धा असणारे बँकेचे सर्व खातेदार, हितचिंतक यांच्या पाठिंब्यावर बँकेने अत्यंत कठीण परिस्थितीतही मार्गक्रमण केलेले आहे व येथून पुढे देखील तसेच होत राहील याचा मला १००% विश्वास आहे. आपल्या मनातील शंका ही कधीही खरी ठरणार नाही याची आपण खात्री बाळगावी. बँकेच्या उत्तम आर्थिक स्थितीचे निर्देशक म्हणजे सीआरएआर हा होय. बँकेचा सीआरएआर हा अपेक्षित निर्देशांका पेक्षा म्हणजे ९% पेक्षा खूप जास्त असून (१३.७२%) आपण काळजी करण्याचे कारण नाही. मी आपल्याला विनंती करतो की आपण चुकीच्या अफवा पसरवून बँकेच्या हिता विरुद्ध वागू नये तसेच अनावश्यकपणे उपस्थित सभासदांच्यामध्ये अस्वस्थता निर्माण करू नये.

आपण बँकेच्या एका शाखेच्या स्थानिक सल्लागार समितीवर आहात तेथे बँकेच्या विकासासाठी मदत करावी व नकारात्मक भूमिकेतून बाहेर यावे असे मी आपणास आवाहन करतो. आतापर्यंतच्या सर्व संचालक मंडळानी बँकेच्या हिताचेच निर्णय घेतलेले असून बँक नक्कीच प्रगतीपथावर वाटचाल करण्यास सिद्ध झाली आहे, परिस्थिती सुधारण्यासाठी विलंब होत आहे मात्र परिस्थिती मध्ये उत्तम सुधारणा होत असून बँक निश्चितच आपल्या सभासदांना लवकरच पुन्हा लाभांश देणे सुरु करेल याची मला खात्री वाटते.

डिव्हिडंड न दिल्याने सभासदांमध्ये नाराजी पसरली आहे हे श्री गोसावी यांनी नमूद केले होते. हे म्हणणे काही अंशी बरोबर असले तरी ती त्यांची भावना असून त्यातून बँकेचे विरुद्ध काही करावे अशी त्यांची मानसिकता नक्की नाही. सर्वसभासदांचे आपणच नेते असल्याचा भाव मनामध्ये धरून आपली भावना म्हणजे सर्व सभासदांची भावना असे गृहीत धरत आहात की जे खरे नाही. डिव्हिडंड देता येत नसल्याबद्दल आमच्या मनात देखील निश्चितच खंत आहे आणि लवकरात लवकर डिव्हिडंड देण्यासाठी कसोशीने प्रयत्न सुरु आहे. बँकेने डिव्हिडंड दिलेला नसतानाही बँकेच्या सभासदांनी बँकेमध्ये ठेवी ठेवून, बँकेचे शेअर्स घेऊन बँकेप्रती विश्वास व्यक्त केलेला आहे.

आपण पत्रात नमूद केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे या ठिकाणी दिलेली आहेत, कदाचित यातून आपले समाधान झाले असावे असे मी गृहीत धरतो.

अर्थातच काही मुद्द्यांवर आपली असहमती असल्यास त्याची केवळ नोंद घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

धन्यवाद

श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी केलेल्या वरील भाषणानंतर त्यासंदर्भात कोणाही सभासदाने पुढील सूचना अथवा माहिती मागितली नाही.

त्यानंतर श्री संजय आगाशे, सचिव यांनी आभार प्रदर्शन करण्याची विनंती अॅड सौ अलका पेटकर, उपाध्यक्षा यांना केली. त्यानुसार अॅड सौ अलका पेटकर, उपाध्यक्षा यांनी आभाराचे भाषण केले. त्यामध्ये उपस्थित सर्व सभासद बंधू व भगिनी यांचे त्यांनी सर्व प्रथम आभार मानले. तसेच श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष व सर्व संचालक यांचेही आभार मानले. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी कार्यरत असणा-या विविध एजन्सीज यांचेही आभार मानले.

त्यानंतर राष्ट्रगीत झाले.

तदंनतर श्री रविंद्र हेजीब, अध्यक्ष यांनी सोमवार दि.१० जुलै २०२३ रोजी आयोजित केलेल्या बँकेच्या ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्याची घोषणा केली.

त्यानंतर बँकेच्या ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज पुर्ण झाले.

* * *